## अंतराळ स्टार्टअपच्या सीईओ, संस्थापकांशी पंतप्रधानांचा संवाद



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि.२१) सेवा तीर्थ येथे देशातील २० अंतराळ स्टार्टअपच्या सीईओ आणि संस्थापकांशी संवाद साधला. यावेळी अंतराळ क्षेत्रात भारतातील खासगी कंपन्यांच्या वाढत्या क्षमता, जागतिक स्तरावर भारतीय अंतराळ तंत्रज्ञानाची वाढती मागणी आणि अंतराळ क्षेत्रातील भविष्यातील संधी यावर चर्चा झाली. पंतप्रधान कार्यालयानुसार बैठकीत रॉकेट बनवणे, पुन्हा वापरता येणारी अंतराळ याने आणि प्रक्षेपण याने, उपग्रह, अंतराळाशी संबंधित इलेक्ट्रॉनिक प्रणाली, नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रॉकेट इंजिन तयार करणे, अंतराळ आणि संरक्षणाशी संबंधित माहिती, अंतराळात जमा होणारा कचरा हटवणे तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने स्थानिक हवामान आणि वातावरणाची माहिती देणाऱ्या तंत्रज्ञानावर काम करणाऱ्या स्टार्टअपचे प्रमुख सहभागी झाले होते.


रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १९ ◆ अंक ३६
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


रायगडात खत खरेदी आता ऑनलाइन!/२

वडखळ परिसरात बोगस डॉक्टरला अटक/५

रायगड जिल्हास्तरीय वुशू अजिंक्यपद स्पर्धा/८


# विरार-अलिबाग मार्गिकेचे सक्तीचे भूसंपादन तातडीने स्थगित करा : आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका (राज्य महामार्ग विशेष क्र. ४) प्रकल्पासाठी पनवेल व उरण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनींचे सुरू असलेले सक्तीचे भूसंपादन तातडीने स्थगित करण्यात यावे, अशी ठाम मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे. जोपर्यंत बाधित शेतकऱ्यांच्या जमिनींच्या मोबदल्याबाबत शासन स्तरावर अंतिम निर्णय होईपर्यंत भूसंपादनाची कोणतीही पुढील कार्यवाही करू नये, असेही त्यांनी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) जनार्दन कासार यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

पनवेल व उरण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेसाठी संपादित करण्यात येत आहेत. या जमिनींच्या



### मोबदल्याबाबत शासन स्तरावरील निर्णय होईपर्यंत प्रक्रिया थांबविण्याची मागणी

मोबदल्याच्या दरासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी यापूर्वी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली होती. त्यानंतर पावसाळी अधिवेशनाच्या कालावधीत ८ जुलै २०२६ रोजी या संदर्भात संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. या बैठकीत बाधित शेतकऱ्यांना यापूर्वी निश्चित करण्यात आलेल्या दरापेक्षा कमी दराने मोबदला दिला जाणार नाही तसेच त्यासाठी शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते, मात्र या आश्वासनानंतरही सक्तीची भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात येत असल्याची माहिती मिळाल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनी हा त्यांच्या उपजीविकेचा तसेच भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे शासन स्तरावर मोबदल्याबाबत अंतिम निर्णय होण्यापूर्वी आणि शेतकऱ्यांना विश्वासात न घेता सक्तीची भूसंपादन प्रक्रिया राबविणे योग्य ठरणार नाही. अशा कार्यवाहीमुळे बाधित शेतकऱ्यांमध्ये संभ्रम, तणाव व असंतोष निर्माण होत असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पत्रात नमूद केले आहे.

शासनाच्या बैठकीत देण्यात आलेल्या आश्वासनानुसार बाधित शेतकऱ्यांना योग्य व न्याय्य मोबदला मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी शासन स्तरावरील निर्णय व आवश्यक कार्यवाही पूर्ण होईपर्यंत आपल्या कार्यालयामार्फत सुरू करण्यात येत असलेली सक्तीची भूसंपादन प्रक्रिया तातडीने स्थगित करावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे.

### ...अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

या संदर्भातील वस्तुस्थिती वरिष्ठ स्तरावर तातडीने कळवून शासनाच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे. अन्यथा बाधित शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संबंधित कार्यालयासमोर तीव्र आंदोलन उभारावे लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे तसेच आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असेही त्यांनी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांना दिलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे.

## एसटीच्या एकेरी गट आरक्षणावरील ३० टक्के अतिरिक्त शुल्क अखेर रद्द

**मुंबई : प्रतिनिधी**



गणेशोत्सवापूर्वी एकेरी गट आरक्षण करून एसटीने कोकणात जाणाऱ्या प्रवाशांच्या प्रवास भाड्यात अतिरिक्त ३० टक्के वाढ करण्याचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाने घेतला होता, मात्र कोकणवासीयांच्या भावना आणि मागणी लक्षात घेऊन हे शुल्क आता रद्द करण्यात आले आहे. याबाबतचे परिपत्रक लवकरच एसटी प्रशासनाकडून जारी करण्यात येईल.

मुंबई, ठाणे येथील आपल्या घरापासून कोकणातील वाड्या-वस्त्यांपर्यंत एसटी बसने थेट जाता येत असल्याने कोकणवासी नेहमीच एसटीला प्राधान्य देत आले आहेत. दरवर्षी गणेशोत्सवाच्या काळात सरासरी पाच हजार बस आरक्षित केल्या जातात. यावर्षी एसटी महामंडळाचा वाढता तोटा कमी करण्यासाठी नाईलाजास्तव एकेरी गट आरक्षणावर ३० टक्के अतिरिक्त शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला होता, परंतु एसटी महामंडळाला होणारा संभाव्य आर्थिक तोटा इतर मार्गांवरील प्रवासी वाहतूक वाढवून भरून काढावा, असे निर्देश परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले.

## आत्महत्या करणाऱ्या मुलाला वाचवताना वडिलांचाही मृत्यू

### आईनेही डोंगरावरून उडी मारून जीवनयात्रा संपवली; छत्रपती संभाजीनगर हादरले!

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**



छत्रपती संभाजीनगरमधील तीसगाव भागातील खवड्या डोंगर परिसरात शुक्रवारी (दि. २१) एक दुर्दैवी घटना घडली. आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या पोटच्या मुलाला वाचवण्याच्या प्रयत्नात वडीलही थेट खोल खदाणीत कोसळले. हे दृश्य पाहून शोक अनावर झालेल्या आईनेही मागचा पुढचा विचार न करता डोंगरावरून उडी टाकली. या तिघांचाही जागेवरच मृत्यू झाला. मन विषण्ण करणाऱ्या या घटनेने सगळेच जण हादरले आहेत.

कुणाल मुरलीधर चांदवडे (वय १८), मुरलीधर चांदवडे आणि संगीता चांदवडे अशी मृतांची नावे आहेत. संबंधित तरुण सकाळी १० वाजल्यापासूनच खवड्या डोंगराच्या कड्यावर उभा होता. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस प्रशासन, अग्निशामक दल आणि परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. सलग तीन तास त्याला खाली उतरवण्यासाठी विनवण्या केल्या जात होत्या. वडिलांनी त्याचा हात धरून कड्यावरून दूर करण्याचा प्रयत्न करीत असताना दोघांचाही तोल जाऊन ते खोल खदाणीत कोसळले, तर हे भयंकर दृश्य पाहून आईनेदेखील त्या दोघांच्या पाठोपाठ उडी घेतली.

आयफोनचा हफ्ता भरण्यावरून कुणालने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे समजते. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## पनवेलच्या झोपडपट्टी पुनर्वसनासाठी मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनाचा आणि त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनस्तरावर हालचालींना वेग आला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पनवेल शहरातील झोपड्यांचे पुनर्वसन करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर आता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिशेने पाऊल उचलण्यात आले आहे. पुनर्विकासाच्या काळात झोपडीधारकांना तात्पुरता निवारा उपलब्ध करून देण्यासाठी

> पनवेलमधील झोपडपट्टीवासीयांना हक्काचा आणि सुरक्षित निवारा मिळावा तसेच पनवेलच्या नियोजित विकासाला गती मिळावी यासाठी शासनस्तरावर आवश्यक तो पाठपुरावा सुरू आहे. हा प्रश्न सकारात्मकरित्या मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.
> -आमदार प्रशांत ठाकूर

### आमदार प्रशांत ठाकूर यांचा पाठपुरावा



एमएमआरडीएच्या रेंटल हाऊसिंग योजनेतील उपलब्ध घरांचा वापर करण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीनुसार मंत्रालयात ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्यासह सिडकोचे एमडी अश्विन मुदगल, जॉइंट एमडी शंतनू गोयल, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पनवेल शहर झोपडपट्टीमुक्त करण्याच्या दृष्टीने गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या प्रयत्नांना या बैठकीमुळे नवी दिशा मिळाली आहे. यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचा पुढाकार आणि पाठपुरावा महत्त्वपूर्ण ठरला आहे. (पान २ वर..)

## निवडक

### नगरसेविका विशाखा राऊत यांचे जात प्रमाणपत्र रद्द

**मुंबई :** उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला एक मोठा धक्का बसला असून नगरसेविका विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद आता धोक्यात आले आहे. पालघर जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे कुणबी प्रमाणपत्र रद्द केले आहे. त्यामुळे त्यांचे नगरसेवकपद रद्द होण्याची शक्यता आहे. राऊत या माजी महापौर असून त्या १९१ नंबरच्या वॉर्डमधून निवडून आल्या आहेत. त्यांना अपीलासाठी तीन महिन्यांची मुदत आहे.

### बॅडमिंटनपटू त्रिसा-गायत्रीचे विश्व स्पर्धेत पदक निश्चित

**नवी दिल्ली :** त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय महिला दुहेरी जोडीने बीडब्ल्यूएफ विश्व अजिंक्यपद स्पर्धेत पदक निश्चित केले आहे. त्रिसा आणि गायत्री यांनी उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या जिया यी फान आणि झांग शू जियान यांच्या जोडीचा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. तब्बल १५ वर्षांनंतर या स्पर्धेत भारतीय महिला दुहेरी जोडीने पदक निश्चित केले आहे.

## संत रोहिदास महाराज जयंतीनिमित्त भाजपतर्फे समरसता संकल्प अभियान

### पनवेलमध्ये बैठक; प्रतिमा आणि मंगल कलश प्रदान




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने विविध धार्मिक, सामाजिक आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. सामाजिक एकोपा आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने समरसता संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून मानवतावादी आणि समतेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यात येणार आहे.

या अभियानाच्या नियोजनासाठी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्तर रायगड जिल्हा भाजपची बैठक पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथे पार पडली. या बैठकीस जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेलचे महापौर नितीन पाटील, जिल्हा सरचिटणीस व सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, अनुसूचित जाती जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, बबन बारगजे, चिंतामण कडवे, बाबू गायकवाड यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी, विविध सेल व मोर्चांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवर आणि कार्यकर्त्यांनी संत रोहिदास महाराजांच्या विचारांचे स्मरण करून सामाजिक समरसता, समानता, बंधुभाव आणि मानवतेची मूल्ये समाजात रुजविण्याचा संकल्प केला.

यावेळी उत्तर रायगड जिल्ह्यांतर्गत असलेल्या १७ मंडळांना संत रोहिदास महाराजांची प्रतिमा आणि मंगल कलश प्रदान करण्यात आले. प्रत्येक मंडळाच्या माध्यमातून जयंतीनिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून संत रोहिदास महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्यासाठी व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. (पान २ वर..)

## खारघर हिल महापौर मॅरेथॉनच्या पूर्वतयारीला वेग

### लोकप्रतिनिधींकडून पाहणी; स्वयंसेवकांना टी-शर्ट वाटप



**खारघर : रामप्रहर वृत्त**

देशातील पहिली ४२ किलोमीटर अंतराची संपूर्ण डोंगराळ भागातील महापौर मॅरेथॉन ठरणाऱ्या खारघर हिल महापौर मॅरेथॉनच्या पूर्वतयारीने आता वेग घेतला आहे. येत्या २३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर महापौर नितीन पाटील यांच्यासह लोकप्रतिनिधींनी शुक्रवारी (दि.२१) प्रत्यक्ष मॅरेथॉन मार्गाची पाहणी केली.

मॅरेथॉन फणसवाडी परिसरातून आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेच्या यशस्वी नियोजनासाठी वाडीतील १०० मुलांनी स्वयंसेवक म्हणून काम करण्याचा निर्णय घेतला आहे. या सामाजिक भावनेबद्दल महापौर नितीन पाटील यांनी फणसवाडीतील स्वयंसेवकांचे विशेष आभार मानले आणि त्यांना टी-शर्टचे वाटप केले.

या मॅरेथॉनमध्ये आतापर्यंत १० हजारांहून अधिक नागरिकांनी आपला सहभाग नोंदवला असून जास्तीत जास्त नागरिकांनी आणि क्रीडाप्रेमींनी या वैशिष्ट्यपूर्ण स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर पाटील यांनी केले आहे. (पान २ वर..)

## कुडपणमध्ये पर्यटन महोत्सव

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील कुडपण या ऐतिहासिक व पुरातन



अविकसित पर्यटनस्थळी २२ आणि २३ ऑगस्ट रोजी पर्यटन महोत्सवाची हाक स्थानिक व मुंबईस्थित ग्रामस्थांनी दिली आहे. यानिमित्ताने पर्यटकांना भोजनासह निवासव्यवस्था मोफत देण्याचा इरादाही आयोजकांनी जाहीर केला आहे.

ब्रिटीशकालीन नकाशामध्ये हिल स्टेशन अशी या कुडपणबाबत नोंद असल्याची माहिती गेल्या २५ वर्षांपासून मिळाल्यानंतर या ठिकाणी पर्यटकांची रेलचेल वाढू लागली आहे. या गावाचे सुपुत्र नायक कृष्णा सोनावणे यांनी ब्रिटीशांच्या बॉईज कंपनीतून सैन्यात प्रवेश घेतल्यानंतर स्वतंत्र भारतातील सेनादलामधून पाकिस्तानी सैन्याची आणि कबाली घुसखोरांची दाणादाण उडविली होती. त्याबद्दल त्यांचा महावीरचक्र देऊन सन्मान करण्यात आला.

कुडपण येथील भराडा, भुतरान आणि आवेरी या तीन नद्यांच्या उगमस्थानाजवळच जगबुडी नदीमध्ये संगम झाला आहे. याठिकाणी असलेल्या स्वयंभू भराडीदेवीच्या मंदिरात काळकाईदेवीही आहे. अतिशय प्राचीन असे हे देवस्थान आहे. अलिकडेच या गावात वातारकांब नावाची एक गुहा आढळून आली आहे. कुडपण येथे प्रस्तरारोहण करण्यासाठी येथील भिमाची काठी या दूर्गम सुळक्यावर चढाईसाठी काही गिर्यारोहक तीन-तीन दिवसांचे कॅम्प करतात. (सविस्तर पान ७ वर..)

## रायगडातील महिलांनी साकारल्या गणरायाच्या दीड लाखांहून अधिक मूर्ती

**अलिबाग : प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेच्या पुढाकारातून उमेद अभियानांतर्गत गणेशमूर्ती व्यवसायात महिलांनी पाऊल ठेवले आहे. यातून महिलांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. जिल्ह्यातील सुमारे २४७ बचत गटातील महिलांनी एक लाख ५३ हजार ५४१ गणपतीच्या मूर्ती तयार केल्या असून यातील दोन हजार २५० मूर्ती परदेशात पाठविण्यात येणार आहेत.

रायगडातील पेण तालुका गणपतीमूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पेणमधील गणपतीमूर्तींना देश-विदेशात मोठी मागणी आहे. सुबक





आखणी, नेटकी बैठक, सुंदर कोरीव काम, डोळ्यांची रेखीव रचना आणि खास रंगकाम यामुळे पेणच्या मूर्तींना विशेष ओळख प्राप्त झाली असून भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या व्यवसायात पेण तालुक्यातील महिला बचत गट उतरले आहेत.

या व्यवसायासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत (उमेद) महिला बचत गटांना फिरता निधी तसेच ग्रामसंघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा करण्यात आला आहे. यामुळे महिलांच्या या व्यवसायाला गती प्राप्त झाली आहे. याद्वारे महिलांच्या हाताला काम मिळाल्याने त्या अधिक सक्षम बनल्या आहेत. जास्तीत जास्त महिलांनी या व्यवसायात सहभागी होण्याचे आवाहन रायगड जिल्हा परिषदेतर्फे करण्यात आले आहे.

### तालुकानिहाय मूर्ती

| तालुका | तयार केलेल्या मूर्तींची संख्या |
| --- | --- |
| अलिबाग | ३२८ |
| कर्जत | ६१४ |
| खालापूर | ९५० |
| महाड | ७० |
| माणगाव | २१२५ |
| मुरुड | २२१० |
| पनवेल | १८० |
| पेण | १४५२८४ |
| रोहा | १९५ |
| श्रीवर्धन | २४० |
| सुधागड | ६०० |
| तळा | १५० |
| उरण | ६९५ |
| एकूण | १५३५४१ |

## आज धोदाणी ते माथेरान इको-फ्रेंडली ट्रेक



**पनवेल, माथेरान : प्रतिनिधी**

निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद घेत आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी धोदाणी ते माथेरान या इको-फ्रेंडली ट्रेकचे विशेष आयोजन येत्या शनिवारी (दि. २२) सकाळी ६ वाजता करण्यात आले आहे. पनवेलचे कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत या ट्रेकिंगचा अनुभव सहभागी नागरिकांना घेता येणार आहे.

ट्रेकचा प्रारंभ धोदाणी बसस्टॉप येथील श्री राम मंदिर येथून होणार आहे. या ट्रेकच्या माध्यमातून निसर्गाशी जवळीक साधण्याबरोबरच युवकांमध्ये फिटनेस, साहस, पर्यावरण संवर्धन आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. निसर्गरम्य डोंगररांगा, हिरवाई आणि परिसरातील मनमोहक वातावरणाचा आनंद घेत मित्र-परिवारासह ट्रेकिंगचा अविस्मरणीय अनुभव घेण्याची ही संधी आहे.

'निसर्गाचा आनंद घ्या, निसर्गाचे संवर्धन करा' हा संदेश या उपक्रमातून देण्यात येणार आहे. या पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी उपक्रमात नागरिकांनी, विशेषतः युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्याच्या शाश्वत विकासासाठी महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत "महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर" या महत्वपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरुप देण्याचे कार्य राज्य शासनाने हाती घेतले आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून "पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा" या अभियानामध्ये सर्वांचा सक्रिय सहभाग महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री तथा पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांनी आज येथे केले.

अलिबाग बीच येथे जिल्हा प्रशासन व जलसंधारण विभागामार्फत आयोजित जिल्हास्तरीय महा वॉकेथॉन २०२६ वॉक फॉर वॉटर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपविभागीय अधिकारी अलिबाग मुकेश चव्हाण, तहसिलदार विक्रम पाटील, जिल्हा मृद व जलसंधारण अधिकारी कविजीत पाटील आदि उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री भरतशेठ गोगावले म्हणाले की, माजी मुख्यमंत्री जलक्रातींचे जनक दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंती निमित्त २१ ऑगस्ट रोजी जिल्हास्तरीय जलसंधारण दिन साजरा करण्यात आला ही अभिमानाची बाब आहे. शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारण हे आवश्यक असून त्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात दि. १५ ते २१ ऑगस्ट, २०२६ दरम्यान "जलसंधारण सप्ताह" आणि १५ ऑगस्ट, २०२६ ते २६ जानेवारी, २०२७ दरम्यान "जलसंधारण अभियान" आयोजित करण्यात आले आहे.

पाणी आहे तर शेती आहे, शेती आहे तर शेतकऱ्याच्या घरात सुख आणि समृध्दी आहे. पाणी हे केवळ आजची गरज नाही तर ते पुढील पिढीचे भविष्य आहे. "महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर" माध्यमातून "पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा" हा जलसंधारणाचा संदेश जनतेपर्यंत पोहचविण्याची तरुणांनी सहभाग घ्यावा. असे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले. या उपक्रमाची थीम सेव सॉईल, सेव वॉटर, सीक्यूर टूमारो अशी असून पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा हे घोषवाक्य आहे.

या रॅलीला पालकमंत्री भरत गोगावले यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात अलिबाग बीच येथून निघून बालाजी मंदिर, छत्रपती शिवाजी चौक, ठिकरुळ नाका, रायगड बाजार मार्गे, अलिबाग बसस्टँड, अलिबाग नगर परिषद, जवळून बालाजी नाका मार्गे पुन्हा अलिबाग बीच येथे समाप्त करण्यात आली. या कार्यक्रमाला विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रायगडात खत खरेदी आता ऑनलाइन!



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रासायनिक खतांची उपलब्धता, ऑनलाइन बुकिंग आणि वितरण प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व शेतकरीहिताची करण्यासाठी कृषी विभागाने 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' ही ऑनलाइन खत विक्री प्रणाली १५ ऑगस्टपासून कार्यान्वित केली आहे. या डिजिटल प्रणालीमुळे शेतकऱ्यांना खतासाठी कृषी केंद्रांवर वारंवार हेलपाटे मारण्याची गरज कमी होणार असून, मोबाईलवरूनच खताचा साठा तपासून बुकिंग करता येणार आहे.

यापूर्वी आवश्यक खत उपलब्ध आहे की नाही, याची माहिती घेण्यासाठी शेतकऱ्यांना विविध कृषी केंद्रांवर जावे लागत होते. त्यामुळे वेळ व पैशांचा अपव्यय होत होता. नवीन ऑनलाइन प्रणालीमुळे शेतकरी आपल्या मोबाईलवरून जवळच्या कृषी केंद्रातील खताचा उपलब्ध साठा तपासून आवश्यक खताचे बुकिंग करू शकणार आहेत. यामध्ये युरिया, डीएपी, सुफला तसेच इतर अनुदानित खतांचा समावेश आहे.

शेतकऱ्यांनी मोबाईलवर 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' हे ॲप्लिकेशन डाउनलोड करून शेतकरी आयडी किंवा आधार क्रमांकाच्या माध्यमातून लॉगिन करावे. त्यानंतर आवश्यक खताची निवड करून जवळचे कृषी केंद्र निवडता येणार आहे. बुकिंग पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्याला क्यूआर कोड किंवा टोकन क्रमांक मिळणार असून, तो संबंधित कृषी केंद्रावर दाखवून खताची खरेदी करता येणार आहे.

स्मार्टफोनची सुविधा नसलेल्या शेतकऱ्यांसाठीही प्रशासनाने पर्याय उपलब्ध करून दिला आहे. अशा शेतकऱ्यांना जवळच्या सीएससी केंद्र, पीएसीएस, अधिकृत खत विक्रेता किंवा एफपीओच्या माध्यमातून ऑनलाइन बुकिंग करता येणार आहे. यासाठी शेतकरी आयडी, आधार क्रमांक तसेच जमीन व पिकांची आवश्यक माहिती उपलब्ध असणे गरजेचे आहे.

ऑनलाइन बुकिंग केल्यानंतर मिळालेला क्यूआर कोड किंवा टोकन क्रमांक दोन दिवसांसाठी वैध राहणार आहे. या कालावधीत खताची खरेदी न झाल्यास शेतकऱ्याला पुन्हा बुकिंग करता येणार आहे. तसेच शेतकऱ्याला स्वतः कृषी केंद्रावर जाणे शक्य नसल्यास, त्याच्या वतीने अधिकृत प्रतिनिधीलाही खत घेता येणार आहे.दरम्यान, जिल्ह्यात खतांची उपलब्धता सुरळीत राहावी आणि कोणत्याही भागात खताची कमतरता भासू नये, यासाठी कृषी विभागाकडून नियोजन करण्यात आले आहे. नवीन प्रणाली प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हास्तरीय व क्षेत्रीय अधिकारी-कर्मचारी तसेच खत विक्रेत्यांना प्रशिक्षण देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ऑनलाइन बुकिंग, खताची उपलब्धता किंवा वितरण प्रक्रियेत अडचण निर्माण झाल्यास शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी, गुणनियंत्रण निरीक्षक किंवा पंचायत समितीच्या कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या डिजिटल प्रणालीचा जास्तीत जास्त लाभ घेऊन खताची उपलब्धता तपासावी आणि ऑनलाइन बुकिंगद्वारे खताची सुलभपणे खरेदी करावी, असे आवाहन जिल्हा कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## महावितरणतर्फे पनवेल शहर विभागात ग्राहक समाधान शिबिरांचे आयोजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महावितरणतर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची व सुविधांची माहिती वीज ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच त्यांच्या समस्या व तक्रारींचे स्थानिक पातळीवर तातडीने निराकरण करण्यासाठी विविध उपविभागीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात 'ग्राहक समाधान शिबिरां'चे आयोजन करण्यात येत आहे. मुख्य अभियंता, भांडुप परिमंडल, संजय पाटील यांच्या निर्देशानुसार भांडुप परिमंडलातील विविध उपविभागीय कार्यालयांमध्ये ग्राहक समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

अधीक्षक अभियंता, वाशी मंडल, दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर विभागात दिनांक १७ ते १९ ऑगस्ट या कालावधीत एकूण १६ ग्राहक समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये, खारघर उपविभागात २, पनवेल उपविभागात ३, तळोजा उपविभागात ८ आणि उरण उपविभागात ३ असे एकूण १६ शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांत एकूण ७४३ वीज ग्राहकांनी सहभाग घेतला असून, ग्राहकांनी मांडलेल्या सर्व ७४३ तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यात आले आहे. यामध्ये खारघर उपविभागातील शिबिरामध्ये १५६ ग्राहक सहभागी असून, त्यांच्या १५६ तक्रारींचे निराकरण करण्यात आले.

पनवेल उपविभागात १५८ ग्राहकांनी सहभागी असून त्यांनी मांडलेल्या १५८ तक्रारींचे निराकरण करण्यात आले. तळोजा उपविभागात ३६० ग्राहक सहभागी असून, त्यांच्या ३६० तक्रारींचे निराकरण करण्यात आले. तसेच उरण उपविभागातील शिबिरांना ६९ ग्राहक सहभागी असून, त्यांच्या ६९ तक्रारींचे निराकरण करण्यात आले. बिलिंगबाबतच्या या ७४३ तक्रारींपैकी केवळ दोन बिलांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता होती. इतर बिले अचूक होती; महावितरणने संबंधित ग्राहकांना बिलातील तपशीलांचे (उदा. विविध शुल्क व आकार) स्पष्टीकरण दिले आणि ते त्याबाबत समाधानी झाले.

या व्यतिरिक्त, एका ग्राहकाला आपला मीटर तपासून घ्यायचा होता; ती तपासणी त्यांच्या समक्ष करण्यात आली. मीटरच्या अचूकतेबाबत त्यांनी ही समाधान व्यक्त केले.ग्राहकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण व्हावे, तसेच महावितरणच्या विविध योजना, सेवा व सुविधांची माहिती ग्राहकांना सहज उपलब्ध व्हावी, हा ग्राहक समाधान शिबिरांचा प्रमुख उद्देश आहे.

## अलिबाग येथील जिल्हा कारागृहात विधी साक्षरता कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण एस. बी. अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग आणि जिल्हा कारागृह, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी ( दि. १९ ) जिल्हा कारागृह, अलिबाग येथे 'विधी साक्षरता कार्यक्रमाचे' यशस्वी आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात मुख्य वक्ते म्हणून विधी सेवा प्राधिकरणाचे पॅनल वकील ॲड. विक्रांत पाटील यांनी उपस्थित होते . कारागृहातील बंदयांना मार्गदर्शन केले. त्यांनी कारागृह, पोलिस ठाणे व इतर संबंधित ठिकाणच्या अधिकारांची माहिती, तसेच कायदेशीर मदतीची उपलब्धता यांवर प्रकाश टाकला. याशिवाय एनएसएलआर (स्पृहा) योजना २०२५' आणि सर्वोच्च न्यायालयाच्या "सुहास चकमा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया" या खटल्यातील निर्णयानुसार उपलब्ध असलेल्या कार्यपद्धतीबाबत ( एस ओ पी ) विस्तृत माहिती दिली.



जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश श्रीमती रेवती म. कंटे अध्यकक्षीय भाषणात म्हणाल्या की, समाजातील कोणताही नागरिक किंवा बंदी आर्थिक अडचणींमुळे कायदेशीर न्यायापासून वंचित राहू नये, हा विधी सेवा प्राधिकरणाचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक गरजू व्यक्तीला वेळेत आणि योग्य कायदेशीर मदत मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे.

या प्रसंगी जिल्हा कारागृह अधीक्षक श्री. बांदल उपस्थिती होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन साहाय्यक ॲड. निलोफर शेख यांनी केले.

## पावणे पुलावरील भीषण अपघातात सासरे-जावयाचा मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे-बेलापूर मार्गावरील पावणे पुलावर बुधवारी रात्री झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील सासरे आणि जावयाचा जागीच मृत्यू झाला. रबाळेहून कोपरखैरणे येथे घरी जात असताना हा दुर्दैवी अपघात झाला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून तुर्भे पोलिसांकडून तपास सुरू आहे.

राजू पंचम जयस्वाल (३५) आणि शिवमूर्ती रामलोकम जयस्वाल (६१) अशी मृतांची नावे आहेत. राजू जयस्वाल हे शिवमूर्ती जयस्वाल यांचे जावई होते. दोघेही रबाळेहून कोपरखैरणे सेक्टर १२ येथील आपल्या घराकडे दुचाकीवरून जात होते.ठाणे-बेलापूर मार्गावरून पावणे पुलाच्या दिशेने जात असताना त्यांच्या दुचाकीचा अपघात झाला. अपघाताची तीव्रता इतकी होती की दोघांनाही गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, अशी माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांसह संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर दोघांनाही महापालिकेच्या वाशी येथील रुग्णालयात नेण्यात आले.

मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.दुचाकीची एखाद्या वाहनाला धडक बसली की अन्य कोणत्या कारणामुळे अपघात झाला, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. पोलिसांकडून घटनास्थळाची पाहणी करून उपलब्ध पुराव्यांच्या आधारे अपघाताच्या नेमक्या कारणाचा शोध घेतला जात आहे.

पान १ वरुन

## पनवेलच्या झोपडपट्टी पुनर्वसनासाठी मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक

पनवेल शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार, वाढती लोकसंख्या आणि विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर शहरातील झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास हा महत्त्वाचा विषय बनला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत झोपडीधारकांना नियोजित पद्धतीने पक्की आणि सुरक्षित घरे उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. या प्रस्तावाला शासनाची मंजुरी या अगोदरच मिळालेली आहे. आता पुनर्वसनाची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबविण्याची तयारी सुरू आहे.

झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करताना सर्वात मोठे आव्हान हे विद्यमान रहिवाशांना संक्रमण काळात सुरक्षित निवारा उपलब्ध करून देण्याचे आहे. पुनर्विकासाच्या काळात झोपडीधारकांना स्थलांतरित करावे लागणार असल्याने त्यांच्या तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर एमएमआरडीएच्या रेंटल हाऊसिंग योजनेतील घरांचा पर्याय बैठकीत चर्चिला गेला. पनवेल महापालिका क्षेत्रात उपलब्ध असलेल्या अशा घरांचा उपयोग झोपडपट्टी पुनर्वसनाच्या काळात करता येईल का याबाबत संबंधित यंत्रणांमध्ये चाचपणी करण्यात आली. त्यामुळे पुनर्विकासाच्या काळात झोपडीधारकांना रस्त्यावर येण्याची वेळ येऊ नये आणि त्यांना सुरक्षित पर्यायी निवारा मिळावा यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू झाले आहेत.

एमएमआरडीएच्या रेंटल हाऊसिंग योजनेतील घरे सिडकोकडे देण्याचा प्रस्ताव आहे. त्या बदल्यात त्या ठिकाणच्या गृहसंकुलांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा देण्याचा प्रस्ताव आहे, मात्र त्याची अंमलबजावणी झालेली नाही. तत्पूर्वी ही घरे पनवेल महापालिकेला देण्यासंदर्भात मागणी करण्यात आली. उपलब्ध पर्यायांची चाचपणी करण्यात आली. त्यामुळे पनवेलमधील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या प्रक्रियेला आवश्यक असलेला तात्पुरता निवारा उपलब्ध करण्यासाठी या घरांचा उपयोग कितपत करता येईल यावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पनवेल शहर झोपडपट्टीमुक्त आणि झोपड्पट्टीवासीयांचे पुनर्वसन करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून आमदार प्रशांत ठाकूर सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत झोपडीधारकांचे पुनर्वसन करून त्यांना हक्काची घरे मिळावीत यासाठी शासनाच्या विविध स्तरांवर त्यांनी पाठपुरावा केला आहे. पनवेलमध्ये विविध विकास प्रकल्प, रस्ते, पायाभूत सुविधा आणि पुनर्विकासाच्या कामांना गती मिळत असताना झोपडपट्टी पुनर्वसनाचा मुद्दासुद्धा मार्गी लावण्याचे अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे या अनुषंगाने झोपडपट्टीवासीयांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## संत रोहिदास महाराज जयंतीनिमित्त भाजपतर्फे समरसता संकल्प अभियान

संत रोहिदास महाराजांनी आपल्या कार्यातून जात-पात, उच्च-नीच आणि सामाजिक भेदभावाला विरोध करत समता, स्वातंत्र्य, बंधुता, मानवता आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला. समाजातील प्रत्येक व्यक्ती समान आहे, हा विचार त्यांनी आपल्या अभंग आणि शिकवणीतून मांडला. त्यांच्या विचारांमध्ये समाजाला एकत्र आणण्याची आणि माणसा-माणसातील भेद दूर करण्याची मोठी ताकद आहे. त्यामुळे आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत संत रोहिदास महाराजांचे विचार अधिक व्यापकपणे समाजापर्यंत पोहचविण्याची गरज असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले.

'मन चंगा तो कठौती में गंगा' या संत रोहिदास महाराजांच्या विचारातून बाह्य दिखाव्यापेक्षा अंतःकरणाची शुद्धता, सदाचार आणि मानवतेचे महत्त्व अधोरेखित होते. समाजात प्रेम, आपुलकी, परस्पर सन्मान आणि बंधुभाव वाढविण्यासाठी त्यांच्या विचारांचा अंगीकार करणे ही काळाची गरज आहे. संत रोहिदास महाराजांनी दिलेला समतेचा संदेश केवळ एका समाजापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले. जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन संत रोहिदास महाराजांच्या विचारांचा जागर करावा आणि 'समरस समाज, सक्षम राष्ट्र' या संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने संत रोहिदास महाराजांच्या ६५०व्या जयंती वर्षानिमित्त देशभरात समरसता संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानातून सामाजिक समरसता आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देतानाच संत परंपरेतील महापुरुषांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्यावर भर देण्यात येत आहे. महाराष्ट्रातही या अभियानांतर्गत विविध जिल्ह्यांमध्ये धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनपर उपक्रम आयोजित केले जात आहेत. त्याचप्रमाणे उत्तर रायगड जिल्ह्यातील १७ मंडळात जयंती कार्यक्रम मोठ्या उत्साहात होणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी यावेळी आपल्या भाषणात सांगितले.

सर्व समाजघटकांनी एकत्र येऊन सामाजिक समरसता आणि बंधुभाव अधिक मजबूत करावा, संत रोहिदास महाराजांच्या विचारांचा अंगीकार करावा आणि त्यांच्या मानवतावादी संदेशातून प्रेरणा घेऊन राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात योगदान द्यावे, असे आवाहनही जिल्हाध्यक्ष कोळी यांनी केले. अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी जयंती कार्यक्रमाची रूपरेषा विशद केली.

उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणी बैठकीत संत रोहिदास महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्याबाबत तसेच येत्या ३० ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमाचे आयोजन प्रभावीपणे करण्याबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीत विविध सामाजिक आणि संघटनात्मक उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. तसेच खारघर हिल मॅरेथॉनला एआयएमएस प्रमाणपत्र प्राप्त होऊन जागतिक स्तरावरील मॅरेथॉनसाठी पात्रता मिळाल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करण्यात आले.

महाराष्ट्र प्रदेश ओबीसी सेलच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ॲड. मनोज भुजबळ, किसान मोर्चाच्या जबाबदारीबद्दल सुनील गोगटे यांच्यासह मधु पाटील, रवींद्र भगत, अजय बहिरा आणि रवींद्र जोशी यांची प्रभाग समिती सभापतीपदी निवड झाल्याबद्दल जिल्हा कार्यकारिणी बैठकीच्या माध्यमातून अभिनंदन करण्यात आले.

## खारघर हिल महापौर मॅरेथॉनच्या पूर्वतयारीला वेग

पावसाळी हवामानाचे आव्हान लक्षात घेता खेळाडूंच्या सुरक्षेसाठी संपूर्ण मार्गावरील स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था आणि आपत्कालीन उपाययोजनांचा सविस्तर आढावा यावेळी प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून घेण्यात आला. या पाहणी दौऱ्यावेळी महापौरांसमवेत सभागृहनेते प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, प्रभाग समिती सभापती मधु पाटील, नगरसेवक प्रवीण पाटील, शत्रुघ्न काकडे यांच्यासह अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# भाजपची संघटनात्मक ताकद वाढतेय!

## ममदापूरमधील विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या हाती 'कमळ'

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश जयराम भगत यांच्या पुढाकाराने नेरळ मंडलातील ममदापूर ग्रामपंचायत हद्दीतील शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. महाराष्ट्र प्रदेश चिटणीस तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश कार्यक्रम आज (दि. २१) पार पडला. या प्रवेशामुळे ममदापूर परिसरात भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक ताकद आणखी वाढली आहे.



पनवेल येथे झालेल्या या कार्यक्रमास यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, जिल्हा सरचिटणीस तथा सभागृह नेते प्रकाश बिनेदार, माजी विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, रमेश मुंढे, नेरळ मंडलाचे सरचिटणीस वैभव भगत, रामदास तुपे, रामदास भगत उपस्थित होते.

ममदापूर ग्रामपंचायतमधील प्रमुख प्रवेश माजी सरपंच कृष्णा शिंगे, माजी सरपंच सखाराम शिंगे, माजी उपसरपंच चंद्रकांत शिनारे, माजी उपसरपंच ज्ञानेश्वर शिनारे, माजी सदस्य दत्तात्रेय कराळे, तसेच ॲड. भावेश शिनारे आणि ॲड. हर्षद शिनारे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. याशिवाय आकाश धुळे, आमन धुळे, मनोहर राणे, मल्हारी शिंगे, भालचंद्र शिंगे, दीपक पावशे, दिनेश शिंगे, ज्ञानेश्वर शिंगे, स्वप्नील शिंगे, मंगेश बिराडे, गणेश कराळे, प्रमोद सरमळकर, अरुण ऐनकर, कमलाकर कदम, नामदेव पेमारे, गुरुनाथ शिंगे, हनुमान शिंगे, नवनाथ शिंगे आणि कोंडू शिंगे आदी कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे ममदापूरसह नेरळ मंडलातील भाजपची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होण्यास मदत होणार असून आगामी काळात केंद्र व राज्य शासनाच्या विकासकामांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्ते अधिक जोमाने काम करतील, असा विश्वास उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

---

# पनवेलच्या विरूपाक्ष मंगल कार्यालयात रंगणार मोदक व पुरणपोळी महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिला गृहउद्योजिकांच्या हाताला बळ देण्यासाठी, त्यांच्या कौशल्याला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि पारंपरिक मराठी खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने 'मोदक व पुरणपोळी महोत्सव २०२६' आयोजित करण्यात आला आहे. शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत विरूपाक्ष मंगल कार्यालय, पनवेल येथे हा महोत्सव रंगणार आहे.




गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोदकांना मोठी मागणी असते. त्याचबरोबर पारंपरिक पुरणपोळी व घरगुती पद्धतीने तयार करण्यात येणाऱ्या विविध खाद्यपदार्थांनाही नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळतो. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात अनेक महिला घरातूनच विविध खाद्यपदार्थ तयार करून छोट्या स्वरूपात व्यवसाय करतात. त्यांच्या उत्पादनांना मोठी बाजारपेठ मिळावी आणि अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचता यावे, या उद्देशातून या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवामध्ये पनवेल, नवीन पनवेल, कामोठे, खारघर, कळंबोली तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध भागांतील महिला गृहउद्योजिका सहभागी होणार आहेत. सहभागी महिलांसाठी स्टॉलची व्यवस्था करण्यात येणार असून विविध प्रकारचे मोदक, पुरणपोळी तसेच महिलांनी तयार केलेले निवडक घरगुती खाद्यपदार्थ नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. महोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी महिला गृहउद्योजिकांशी संवाद साधून त्यांची नोंदणी करण्यात आली आहे. महिलांच्या उत्पादनांचा दर्जा, स्वच्छता, आकर्षक सादरीकरण तसेच ग्राहकांपर्यंत त्यांची उत्पादने प्रभावीपणे पोहोचविणे याबाबतही विशेष लक्ष दिले जात आहे.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेला हा महोत्सव केवळ एका दिवसाच्या विक्रीपुरता मर्यादित न राहता महिला गृहउद्योजिकांना भविष्यात नियमित ग्राहक मिळवून देण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. महानगरपालिका क्षेत्रातील गृहउद्योग करणाऱ्या महिलांची माहिती संकलित करून त्यांना विविध उपक्रम, प्रशिक्षण आणि व्यवसायाच्या नवीन संधींशी जोडण्यासाठीही प्रयत्न करण्यात येत आहेत.

स्थानिक नागरिकांना आपल्या परिसरातच घरगुती पद्धतीने तयार केलेले दर्जेदार पदार्थ सहज उपलब्ध व्हावेत आणि त्याचवेळी महिला गृहउद्योजिकांच्या व्यवसायाला थेट आर्थिक चालना मिळावी, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश आहे. महिला उद्योजिका आणि स्थानिक ग्राहक यांच्यात थेट संपर्क निर्माण झाल्यास भविष्यात महिलांना नियमित ऑर्डर आणि कायमस्वरूपी ग्राहकवर्ग निर्माण करण्यास मदत होणार आहे.

> **आपल्या पनवेल महानगरपालिका क्षेत्रात अनेक महिला अत्यंत उत्तम दर्जाचे घरगुती पदार्थ तयार करतात. त्यांच्या कौशल्याला योग्य बाजारपेठ आणि ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळणे गरजेचे आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून महिला गृहउद्योजिकांना स्वतःची ओळख निर्माण करण्यासोबतच त्यांचा व्यवसाय वाढविण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. पनवेलकरांनी मोठ्या संख्येने महोत्सवाला भेट देऊन आपल्या स्थानिक महिला उद्योजिकांना प्रोत्साहन द्यावे.**
>
> **-ममता म्हात्रे, सभापती महिला व बालकल्याण समिती**

---

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात राखी निर्मिती स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या गणित विभागातर्फे शुक्रवार, दिनांक २१ ऑगस्ट २०२६ रोजी राखी निर्मिती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



मॅथेमॅटिक्स द बॉड ऑफ इनफायनाट क्रिएटिव्हिटी" या संकल्पनेवर आधारित या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी गणितीय संकल्पना, आकृत्या, सममिती, मॅथेमॅटिकल मंडला, फिबोनाकी स्पायरल, पाय वर्तुळाकार रचना आणि टेसेलेशन यांचा वापर करून आकर्षक व नाविन्यपूर्ण राख्या साकारल्या.

या स्पर्धेचे परीक्षण प्रा.रेहनूमा खान यांनी केले. विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, नाविन्यता, गणितीय संकल्पनांचा वापर, नीटनेटकेपणा आणि एकूण सादरीकरण या निकषांवर विजेत्यांची निवड करण्यात आली.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, कल्पकतेला आणि गणिताकडे कलात्मक दृष्टिकोनातून पाहण्याच्या क्षमतेला प्रोत्साहन देणे हा होता. विद्यार्थ्यांनी पारंपरिक राखी निर्मितीमध्ये गणिताची सांगड घालत विविध सुंदर कलाकृती सादर केल्या. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे व सर्जनशीलतेचे कौतुक केले.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रतीक्षा पाटील, गणित विभाग प्रमुखयांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तसेच डॉ. नीलम लोहकरे, विज्ञान शाखा प्रभारी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विज्ञान विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

**स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे**

प्रथम क्रमांक: कृतिका अरोरा एसवायबीएमएस

द्वितीय क्रमांक : हिमानी मोकल एसवायसीएस

तृतीय क्रमांक : महेक शेख एफवायबीएससी

---

# मॉडर्न स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, वाशी येथे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा सुरक्षित व जबाबदार वापर याबाबत जनजागृती करण्यासाठी मूलभूत सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, बनावट लिंक, पासवर्डची सुरक्षितता, OTP ची गोपनीयता, सोशल मीडिया सुरक्षा आणि इंटरनेटचा जबाबदार वापर यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.



सायबर धोके ओळखण्यासोबतच ऑनलाइन व्यवहार करताना वैयक्तिक व गोपनीय माहिती सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

या कार्यक्रमासाठी पोलीस विभागातील सुरेश मेनन, बोंडायक अडेपू, प्रेम गुराणी, शारदा देशमुख आणि संदीप वाघमारे (पोलीस, वाशी) यांचे सहकार्य लाभले.तसेच IWCNB तर्फे किमी कौर (जिल्हा समन्वयक), रीना सावला (क्लब अध्यक्ष), रिया भाटिया (क्लब सचिव), मानसी कांकरें (क्लब समन्वयक), वाहिदा शेख (कार्यकारी सदस्य) आणि आनंदिता दास (ISO) यांनी सहभाग घेतला.

या मार्गदर्शन सत्रामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल जगात सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती मिळाली. पासवर्ड व OTP कोणासोबतही शेअर करू नये, संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये आणि सायबर फसवणूक किंवा संशयास्पद ऑनलाइन व्यवहारांची त्वरित माहिती द्यावी, असा संदेश देण्यात आला.

---

# उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा! गणेशोत्सव स्पर्धेच्या विजेत्यांचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत 'उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा!' हे पर्यावरणपूरक गणेशोत्सव अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आयोजित पर्यावरणपूरक घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव सजावट स्पर्धा २०२५ मधील विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ तसेच २०२६ च्या स्पर्धेचा शुभारंभ गुरूवारी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महापौर नितीन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात करण्यात आला.



यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील,सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, प्रभाग समिती डचे सभापती अजय बहिरा, महापालिका सदस्य विकास घरत, सुमित झुंझारराव, दर्शना भोईर, श्वेता बहिरा, डॉ. प्रियंका कांडपिळे, मनाली ठाकूर, प्रतिभा भोईर, उपायुक्त स्वरूप खारगे उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पर्यावरण संवर्धन, शाश्वत सजावट, पर्यावरणपूरक गणेशमूर्ती, निर्माल्य व्यवस्थापन आणि स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या सहभागी गणेशभक्तांचेही कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरलेल्या www.pmecoganesha.com या संकेतस्थळाचे उद्घाटन महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या संकेतस्थळाच्या माध्यमातून २०२६ च्या पर्यावरणपूरक घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव सजावट स्पर्धेसाठी नागरिकांना ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे तसेच स्पर्धेची नियमावली, आवश्यक माहिती आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाशी संबंधित विविध उपक्रमांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. महानगरपालिकेने आवाहन केलेल्या पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या सप्तसूत्रीची ई-प्रतिज्ञाही या संकेतस्थळावरून घेता येणार असून, ई-प्रतिज्ञा पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र डाउनलोड करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

'मिशन फिफ्टी'च्या माध्यमातून गृहनिर्माण संस्थांमध्ये पर्यावरणाचा जागर पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश घराघरांत पोहोचविण्यासोबतच गृहनिर्माण संस्थांमध्येही पर्यावरणविषयक जनजागृती व्हावी, यासाठी पनवेल महानगरपालिकेने 'मिशन फिफ्टी' हा अभिनव उपक्रम राबविला. या उपक्रमाची माहिती सुमारे १ हजार गृहनिर्माण संस्थांपर्यंत पत्राद्वारे पोहोचविण्यात आली. सुरुवातीला ५० इच्छुक गृहनिर्माण संस्थांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवविषयक उपक्रम राबविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. मात्र, गृहनिर्माण संस्थांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा उपक्रम ५० ऐवजी ६० गृहनिर्माण संस्थांमध्ये राबविण्यात आला. सहभागी गृहनिर्माण संस्थांमध्ये महिला, विद्यार्थी व लहान मुलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सव, कचरा व्यवस्थापन, निर्माल्य व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धन याबाबत मार्गदर्शनपर व्याख्याने व चर्चासत्रे घेण्यात आली. नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग वाढवून पर्यावरणपूरक गणेशोत्सव हा सामूहिक उपक्रम बनविण्यावर या माध्यमातून भर देण्यात आला.

'उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा!' या अभियानाच्या माध्यमातून पनवेल महानगरपालिकेने जनजागृती, स्पर्धा आणि 'मिशन फिफ्टी' अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला आहे. शाळा-महाविद्यालयांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती, शाडू मातीच्या गणेशमूर्ती तयार करण्याच्या कार्यशाळा, पर्यावरणविषयक व्याख्याने, लघुपटांचे प्रदर्शन तसेच विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात आली. गृहनिर्माण संस्थांमध्येही विविध उपक्रम राबवून पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नागरिकांचा सहभाग वाढविण्यात आला. गणेशभक्ती आणि पर्यावरण संवर्धन यांचा समन्वय साधत नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करावा, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

यासाठी शाडू मातीच्या किंवा पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करावा, नैसर्गिक रंगांचा वापर करावा, प्लास्टिकचा वापर टाळावा, निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करावे तसेच शक्यतो कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर करून जलस्रोतांचे संरक्षण करावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

---

# पनवेलमध्ये मराठी न बोलणाऱ्या १७ चालकांना नोटिसा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी भाषेत संवाद साधता न येणाऱ्या रिक्षा व टॅक्सी चालकांविरोधात पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाने विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत एका दिवसात तब्बल १५० रिक्षा व टॅक्सींची तपासणी करण्यात आली. त्यापैकी मराठी बोलता येत नसलेल्या १७ चालकांना जागेवरच नोटिसा बजावण्यात आल्या. पनवेल परिसरात राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेदरम्यान रिक्षा व टॅक्सींची कागदपत्रे, परवाने तसेच नियमांचे पालन केले जात आहे की नाही, याची तपासणी करण्यात आली.



यावेळी काही चालकांना मराठी भाषेत बोलता किंवा प्रवाशांशी संवाद साधता येत नसल्याचे आढळून आले. त्यामुळे संबंधित १७ चालकांवर नोटिसांची कारवाई करण्यात आली.

नोटीस बजावण्यात आलेल्या चालकांना दोन ते तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला असून, या कालावधीत मराठी भाषा शिकून प्रवाशांशी संवाद साधता यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. नोटीसचा कालावधी संपल्यानंतरही संबंधित चालकांना मराठीत संवाद साधता येत नसल्याचे आढळल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

गरज भासल्यास संबंधित रिक्षा अथवा टॅक्सीचा परवाना रद्द करण्याची कारवाईही केली जाऊ शकते, अशी माहिती पनवेल प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे रिक्षा व टॅक्सी चालकांनी प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी मराठी भाषा आत्मसात करावी, असे आवाहन परिवहन विभागाकडून करण्यात आले आहे.

---

# पत्रकार संजय कदम जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

**पनवेल : वार्ताहर**

ऑल जर्नालिस्ट अँड फ्रेंड्स सर्कलच्या मुंबईत झालेल्या राज्यस्तरीय पत्रकार प्रेरणा पुरस्कार सोहळ्यात पनवेलचे ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.या पुरस्कार सोहळ्याला दैनिक पुढारी मुंबई आवृत्तीचे संपादक राजेश नाईक, केंद्रीय अध्यक्ष यासिन पटेल,विश्वस्त गणेश कोळी, युयुत्सु आर्ते,प्रदेशाध्यक्ष एड.विठ्ठल मोघे,सरचिटणीस गोविंदसिंग राजपूत,सदस्य अनिल कुरघोडे आदी उपस्थित होते.



## संपादकीय

# पुन्हा तुष्टीकरणाची वाट

प्रश्न काँग्रेसच्या अंतर्गत कार्यक्रमांचा नसून 'वंदे मातरम्'संबंधीच्या त्यांच्या भूमिकेमागील मानसिकतेचा आहे. १९३७ मध्ये तत्कालीन राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर 'वंदे मातरम्'च्या काही भागांबाबत तडजोड झाली होती. आज स्वातंत्र्याच्या अमृतकाळात देश अधिक आत्मविश्वासाने जगासमोर जात असताना, त्याच जुन्या तडजोडीला पुन्हा राजकीय आधार देण्याची गरज काय?

**काँग्रेस कार्यसमितीच्या अलीकडेच झालेल्या बैठकीत या पक्षाने १९३७ मधील आपल्या ठरावाचा आधार घेत पक्षाच्या कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम्'ची केवळ पहिली दोन कडवीच गाण्याचा निर्णय पुन्हा एकदा घेतला. हीच भूमिका ऐतिहासिकदृष्ट्या योग्य असून पक्ष याद्वारे कोणत्याही प्रकारे या राष्ट्रीय गीताचा अवमान करीत नाही अशी काँग्रेस पक्षाची भूमिका आहे, परंतु 'वंदे मातरम्' हे केवळ एक गीत नाही तर स्वातंत्र्यलढ्याच्या काळात भारतीयांच्या मनात राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित करणारा मंत्र आहे याचा यावेळी काँग्रेस पक्षाला विसर पडलेला दिसतो. या राष्ट्रीय गीताच्या १५०व्या वर्षानिमित्त सध्या देशात कार्यक्रम सुरू असताना काँग्रेसने त्याच्या सादरीकरणाबाबत घेतलेला निर्णय त्यामुळेच जनतेला अधिक खटकणारा ठरतो. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेसच्या संबंधित निर्णयावर याच मुद्यावरून जोरदार टीका केली आहे. काँग्रेसने १९३७मध्ये तुष्टीकरणाच्या राजकारणासाठी 'वंदे मातरम्'चे विभाजन केले आणि त्याच मानसिकतेचा पुनरुच्चार या पक्षाकडून आता होत असल्याचा आरोप शाह यांनी केला आहे. त्यांच्या मते, हा केवळ दोन कडवी गाण्याचा प्रश्न नसून राष्ट्राच्या प्रतीकांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचा प्रश्न आहे. त्यांनी काँग्रेसची भूमिका तुष्टीकरणाची आणि राष्ट्रभावनेचा अनादर करणारी असल्याचे म्हटले असून या निर्णयाविरोधात जनतेने आवाज उठवावा असे आवाहनही त्यांनी केले आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने 'वंदे मातरम्'ला राष्ट्रीय गीत म्हणून असलेले स्थान अधिक स्पष्ट केले आहे. गृह मंत्रालयाच्या अधिकृत आदेशांमध्ये राष्ट्रीय गीताच्या गायन-सादरीकरणाबाबत नियम उपलब्ध आहेत. शिवाय २०२६मध्ये राष्ट्रीय गीतालाही राष्ट्रीय सन्मानाच्या कायदेशीर संरक्षणाच्या कक्षेत आणण्याची प्रक्रियाही करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही काँग्रेसच्या संबंधित भूमिकेवर तीव्र प्रहार केला आहे. दोनच कडवी गाण्याच्या निर्णयाला त्यांनी काँग्रेसच्या जुन्या तुष्टीकरणाच्या राजकारणाचे प्रतिबिंब म्हटले आणि राष्ट्रीय गीतासारख्या राष्ट्रीय भावनेच्या प्रतीकाबाबत अशी मानसिकता स्वीकारणे योग्य नसल्याचे स्पष्ट केले. फडणवीस यांच्या टीकेतला मुद्दा महत्त्वाचा आहे. भारतात आता इंग्रजांची सत्ता नाही. स्वतंत्र भारताच्या संसदेने घेतलेला निर्णय संवैधानिक असतो. हा निर्णय मानणार नाही असे म्हणणारे मानसिक गुलाम आहेत अशी टीका फडणवीस यांनी केली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी 'वंदे मातरम्'चा जयघोष केला, त्यांच्या त्यागाकडे राजकीय सोयीच्या चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही असेही ते म्हणाले. प्रत्येक राष्ट्रीय प्रतीकाला मतांच्या गणिताशी जोडण्याची सवय लोकशाहीसाठी निश्चितच हितावह नाही. आजचा भारत १९३७चा भारत नाही. तुष्टीकरणाच्या राजकारणापलीकडे जाऊन समान नागरिकत्व, राष्ट्रीय अभिमान आणि 'एक भारत' या भावनेला बळ देण्याचा हा काळ आहे. 'वंदे मातरम्'चा जयघोष कोणत्याही एका पक्षाचा किंवा समुदायाचा नसून संपूर्ण भारताचा आहे. त्यामुळे राजकीय गणितासाठी त्याची कडवी मोजण्यापेक्षा त्यामागच्या राष्ट्रभक्तीच्या भावनेचा सन्मान राखीत ते गाण्याची गरज आहे, पण तसे न करता, ठरावाद्वारे काँग्रेसने या राष्ट्रीय गीताच्या अवमानाला औपचारिक रूप दिले आहे असे खेदाने म्हणावे लागते.**

# पाण्याची वाट शासनाच्या पुढाकारातून समृद्धीकडे

पाण्याला स्मृती असते की नाही, माहीत नाही, पण एखाद्या प्रदेशाच्या विकासाच्या इतिहासाला पाण्याची स्मृती नक्कीच असते. कुठे नदीने संस्कृती उभी केली, कुठे कालव्याने शेती बदलली, तर कुठे एखाद्या छोट्याशा बंधाऱ्याने गावाचे अर्थकारण बदलले. म्हणून पाणी हा केवळ निसर्गाने दिलेला स्रोत नसतो; तो शासनाच्या नियोजनाची कसोटी, तंत्रज्ञानाच्या क्षमतेची परीक्षा आणि लोकसहभागाच्या संस्कृतीचा आधार असतो. नंदुरबारच्या बाबतीत हे अधिक ठळकपणे जाणवते. एका बाजूला नर्मदा, दुसरीकडे तापी आणि मध्ये सातपुड्याच्या डोंगररांगा. पावसाळ्यात हिरवाईने नटणारा प्रदेश आणि काही महिन्यांनी पाण्याचे नियोजन हा केंद्रस्थानी येणारा प्रश्न. या विरोधाभासाचे उत्तर केवळ अधिक पाऊस पडण्यात नाही, तर पडणाऱ्या आणि उपलब्ध असलेल्या पाण्याचे किती परिणामकारक व्यवस्थापन करता येते यात आहे.

गेल्या काही वर्षांत शासनाने नंदुरबारच्या जलव्यवस्थेकडे केवळ 'पाणीटंचाईचा जिल्हा' म्हणून पाहण्याऐवजी उपलब्ध जलसंपत्तीचे एकात्मिक व्यवस्थापन करता येणारा जिल्हा म्हणून पाहण्यास सुरुवात केली आहे. मोठे प्रकल्प, मध्यम व लघु सिंचन योजना, जलसंधारण, भूजल पुनर्भरण, पाणीवापर संस्था आणि उपसा सिंचन या सर्व घटकांना जोडण्याचा प्रयत्न हीच या परिवर्तनाची खरी दिशा आहे. याच पार्श्वभूमीवर २१ ऑगस्ट रोजी साजऱ्या होणाऱ्या जलसंधारण दिनाला यंदा विशेष औचित्य प्राप्त झाले आहे. राज्यभर आयोजित होणारी 'महा वॉकेथॉनवॉक फॉर वॉटर' ही केवळ प्रतीकात्मक पदयात्रा नाही. 'Save Soil, Save Water, Secure Tomorrow' हा तिचा संदेश शासनाच्या जलनीतीशी थेट जोडलेला आहे. पाणी अडविणे, जिरविणे, जपणे आणि सुयोग्य पद्धतीने वापरणे ही केवळ सरकारी योजनांची उद्दिष्टे न राहता समाजाची सामूहिक जबाबदारी बनावी हा या उपक्रमामागचा व्यापक विचार आहे.

नंदुरबारमध्ये या वॉकेथॉनची पावले एका वास्तव प्रवासाशी जुळतात आणि तो प्रवास नर्मदेच्या हक्काच्या पाण्यापासून सुरू होतो. नर्मदा प्रकल्प पूर्ण झाला, महाराष्ट्राने पुनर्वसनाची जबाबदारी पार पाडली, राज्याला वीज मिळाली; पण महाराष्ट्राच्या वाट्याचे पाणी प्रत्यक्ष वापरासाठी उपलब्ध होण्याचा प्रश्न जवळपास वीस वर्षे प्रलंबित राहिला. म्हणजे संसाधन होते, हक्क होता; परंतु त्या हक्काला प्रत्यक्ष उपयोगात आणणारी प्रशासकीय आणि आंतरराज्यीय कोंडी सुटलेली नव्हती. हीच कोंडी ७ जुलै २०२६ रोजी नवी दिल्लीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत सुटण्याच्या निर्णायक टप्प्यावर आली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या चार राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या हक्काच्या पाण्याचा प्रश्न ठामपणे मांडला आणि या बैठकीत महाराष्ट्राला आपल्या वाट्याचे १० टीएमसी पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

या निर्णयाचे महत्त्व केवळ '१० टीएमसी' या आकड्यात नाही. त्यामागे शासनाचा सातत्यपूर्ण पाठपुरावा,आंतरराज्यीय समन्वय आणि उत्तर महाराष्ट्राच्या दीर्घकालीन जलसुरक्षेचा विचार आहे. या १० टीएमसीपैकी ५ टीएमसी पाणी नर्मदा-तापी डायव्हर्जन योजनेतून आणि आणखी ५ टीएमसी पाणी उकाईन प्रकल्पातून उपलब्ध करून देण्याची महाराष्ट्राची भूमिका होती. या मागणीला अनुकूल प्रतिसाद मिळाला. पावसाळ्यात उकाई धरणात पुरेसे पाणी उपलब्ध असताना तेथून ५ टीएमसी पाणी महाराष्ट्राने उचलण्यास गुजरातने अनुकूलता दर्शविली. हे केवळ पाणीवाटपाचे यश नाही; उपलब्ध जलस्रोताचा उपयोग महाराष्ट्राच्या गरजेनुसार करण्यासाठी शासनाने केलेल्या नियोजनबद्ध प्रयत्नांचे ते फलित आहे.

इथेच शासनाच्या जलनियोजनातील एक महत्त्वाचा बदल दिसतो. पूर्वी पाणी जिथे नैसर्गिकरीत्या पोहोचते तिथे सिंचन होते. आता शासनाची भूमिका त्यापलीकडे गेली आहे. पाणी उपलब्ध आहे, पण भूगोलामुळे शेतापर्यंत येत नाही, तर ते तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उचलून नेण्याची व्यवस्था उभी करायची, हा दृष्टिकोन पुढे आला आहे. यालाच उपसा सिंचनाचे महत्त्व म्हणावे लागेल. नंदुरबारचा भूभाग उंचसखल आहे. पारंपरिक कालव्यांवर आधारित सिंचन सर्व भागांत शक्य होईलच असे नाही. अशा परिस्थितीत नदी किंवा जलाशयातून पाणी उचलून ते उंच भागातील शेतांपर्यंत पोहचविणाऱ्या उपसा सिंचन योजना या जिल्ह्यासाठी केवळ पर्यायी उपाय नाहीत, तर अनेक भागांसाठी विकासाचा व्यवहार्य मार्ग आहेत.

शासनाने याच शक्यतेचा विचार करून उकाईतील पाणी उचलण्यासाठी सुव्यवस्थित आराखडा तयारकरण्याची भूमिका घेतली आहे. भविष्यात पंपिंग स्टेशन, बंदिस्त जलवाहिन्या, आवश्यक उंचीपर्यंत पाणीनेण्याची अभियांत्रिकी रचना आणि वितरण व्यवस्था यांची सांगड घालून उत्तर महाराष्ट्रातील लाभक्षेत्राला पाणी उपलब्ध करून देता येणार आहे. उपसा सिंचनाचा अर्थ फक्त पाणी वर उचलणे एवढाच नसतो; तो प्रत्यक्षात भूगोलाने वंचित ठेवलेल्या शेतापर्यंत शासनाने पाणी पोहोचविण्याचा प्रयत्न असतो. सातपुड्याच्या पायथ्याशी किंवा उंचसखल भागात बसलेल्या शेतकऱ्याला मोठ्या नदीच्या जवळ असूनही त्या पाण्याचा उपयोग करता येत नसेल, तर तंत्रज्ञानाचा उपयोग करून ती दरी भरून काढणे आवश्यक ठरते. उकाईच्या पाण्याबाबतचा निर्णय म्हणूनच नंदुरबारच्या संदर्भात विशेष सकारात्मक आहे.

पण नंदुरबारच्या जलसिंचनाची कहाणी केवळ उद्याच्या उकाईवर अवलंबून नाही. तापी नदीवरील प्रकाशा आणि सारंगखेडा बॅरेज या जिल्ह्याच्या सिंचन व्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. प्रकाशा बॅरेजच्या माध्यमातून सुमारे १० हजार ३०७ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा आधार मिळण्याची क्षमता आहे, तर सारंगखेडा बॅरेजची अंतिम सिंचन क्षमता सुमारे ११ हजार ५१९ हेक्टर असून त्याचा नियोजित पाणीवापर सुमारे ९२.१९ दशलक्ष घनमीटर आहे. हे बॅरेज म्हणजे केवळ तापीवर उभ्या असलेल्या अभियांत्रिकी रचना नाहीत; त्यांनी वाहत्या नदीला स्थानिक अर्थव्यवस्थेशी जोडले. तापीतून वाहून जाणारे पाणी अडविले गेले, साठविले गेले, त्यातून प्रत्यक्ष सिंचनासह परिसरातील भूजल पातळीलाही आधार मिळाला. विहिरींमार्फत होणारे अप्रत्यक्ष सिंचन वाढले आणि उपलब्ध जलस्रोताचा व्यापक कृषी उपयोग शक्य झाला.

याच व्यवस्थेला रंगावली, शिवण, नागन, कोरडी, दरा आणि इतर मध्यम व लघु प्रकल्पांची साथ आहे. गाव तलाव, पाझर तलाव, साठवण बंधारे, के.टी. वेअर आणि भूजल पुनर्भरणाची कामे या संपूर्ण जलव्यवस्थेला स्थानिक पातळीवर बळ देतात. मोठ्या धरणांची भव्यता लगेच दिसते, पण छोट्या बंधाऱ्यांचा परिणाम अनेकदा जमिनीखाली घडत असतो. पाणी थांबते, मुरते, विहिरींची पातळी टिकते आणि काही महिन्यांनी त्या पाण्याचे रूपांतर शेतातील हिरव्या पिकात होते. म्हणून मोठे सिंचन आणि जलसंधारण ही स्वतंत्र धोरणे नसून एकाच जलचक्राच्या परस्परपूरक बाजू आहेत.

शासनाच्या जलनीतीत आता आणखी एक महत्त्वाचा विचार केंद्रस्थानी येत आहे. मोठा प्रकल्प उभारणे ही प्रक्रिया संपल्याची खूण नाही; त्या प्रकल्पातून निर्माण झालेल्या क्षमतेचा पूर्ण आणि कार्यक्षम वापर करणे ही खरी कसोटी आहे. इथेच कालवा व्यवस्थेबरोबर उपसा सिंचन योजनांचा वापर महत्त्वाचा ठरतो. ज्या भागाला गुरुत्वाकर्षणावर आधारित कालव्याने पाणी पोहोचणे कठीण आहे, तिथे पंपिंगद्वारे पाणी उचलून बंदिस्त वितरण प्रणालीने शेतांपर्यंत नेता येते. यामुळे पाण्याची गळती कमी करता येते, वितरणावर नियंत्रण ठेवता येते आणि उपलब्ध पाण्याच्या प्रत्येक थेंबाची उत्पादकता वाढविता येते.नंदुरबारसारख्या जिल्ह्यात याचा दूरगामी परिणाम होऊ शकतो, कारण सिंचन मिळाले की केवळ एक पीक वाचत नाही; पीकपद्धती बदलते, रब्बीची शक्यता वाढते, फळबाग घेण्याची हिंमत निर्माण होते, भाजीपाला आणि नगदी पिकांचे क्षेत्र वाढू शकते आणि शेतीतून वर्षभर उत्पन्न मिळण्याची शक्यता तयार होते. उत्पन्नाची खात्री वाढली, तर मजूरांच्या हंगामी स्थलांतराचा दबाव कमी होण्यासही मदत होईल.

या सगळ्या पायाभूत सुविधांना अर्थ देणारा आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे पाणीवापर संस्था. धरण शासन बांधते, पंपिंग स्टेशन शासन उभे करते, कालवे आणि जलवाहिन्या शासन तयार करते; पण त्या पाण्याचा न्याय्य, काटकसरीने आणि नियोजनबद्ध वापर करण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांचा सहभाग आवश्यक असतो. पाणीवापर संस्था ही शासन आणि शेतकरी यांच्यातील हीच भागीदारी साकारते. पाण्याच्या आवर्तनांचे नियोजन, उपलब्ध साठ्यानुसार पीक नियोजन, वरच्या भागाने जास्त पाणी वापरून खालच्या टोकावरील शेतकऱ्यावर अन्याय होऊ न देणे, पाण्याचा अपव्यय रोखणे व देखभाल व्यवस्थेत शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे या सर्व बाबींमध्ये पाणीवापर संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरते.

ही संकल्पना एका मोठ्या बदलाचे द्योतक आहे. 'सरकारने पाणी द्यावे' या अपेक्षेपासून 'सरकार आणि शेतकरी मिळून पाणी व्यवस्थापित करूया' या सहभागात्मक संस्कृतीकडे जाण्याचा हा प्रवास आहे. प्रकाशा आणि सारंगखेडा बॅरेजच्या लाभक्षेत्रात असो, मध्यम प्रकल्प असोत किंवा भविष्यातील उपसा सिंचन योजना असोत, पाण्याचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करण्यासाठी या संस्थांचे बळकटीकरण आवश्यक ठरेल. जलसंपत्ती निर्माण करणे हा पहिला टप्पा आहे; तिचे वितरण, व्यवस्थापन, देखभाल आणि लोकसहभागातून शाश्वत वापर सुनिश्चित करणे हा दुसरा आणि तितकाच महत्त्वाचा टप्पा आहे.

**-रणजितसिंह राजपूत,**
जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार



## बदलते तंत्रज्ञान

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वर्षभर जेमिनी प्लस मोफत

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर गुगलने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मोठी घोषणा केली आहे. भारतातील




पात्र कॉलेज विद्यार्थ्यांना गुगलकडून एक वर्षासाठी 'Google AI Plus'चे मोफत सदस्यत्व दिले जात आहे. यासोबतच अभ्यास अधिक सोपा आणि प्रभावी करण्यासाठी सेंट्रलाइज्ड स्टुडंट हब, स्मार्ट स्टडी नोटबुक्स, 3D सिम्युलेशन आणि व्हॉईस-बेस्ड डीप रिसर्च यांसारख्या प्रगत आर्टिफिशियल इंटेलिजन्स स्टडी टूल्सचा संच जेमिनी ॲपमध्ये देण्यात आला आहे.

पात्र विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी मोफत 'Google AI Plus' ॲक्सेस मिळेल. यामध्ये जेमिनी ऑम्नी, दोन पट अधिक युसेज लिमिट आणि तब्बल ४०० GB क्लाउड स्टोरेज दिले जात आहे. ज्या विद्यार्थ्यांना जाहिरातमुक्त व्हिडिओ आणि म्युझिक स्ट्रीमिंग हवे आहे, त्यांच्यासाठी 'Google AI Pro' आणि 'YouTube Premium' बंडलवर ७० टक्यांपर्यंत घसघशीत सवलत दिली जात आहे.

विद्यार्थी ही ऑफर https://gemini.google.com/students या अधिकृत लिंकवर जाऊन व्हेरिफाय करून मिळवू शकतात.

स्टुडंट हब : जेमिनी ॲपमध्ये थेट इंटिग्रेट करण्यात आलेले हे डॅशबोर्ड विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल वर्कस्पेस म्हणून काम करेल. येथून विद्यार्थी सानुकूल फ्लॅशकार्ड्स, प्रॅक्टिस टेस्ट्स आणि स्टडी नोटबुक्स एका क्लिकवर तयार करू शकतात. हे फीचर सध्या वैयक्तिक गुगल खात्यांवर वेब आणि मोबाईलवर उपलब्ध आहे.

विद्यार्थी लेक्चर्सच्या नोट्स आणि फाइल्स अपलोड करून त्याचे स्टेप-बाय-स्टेप रिव्हिजन ट्रॅकमध्ये रूपांतर करू शकतात. जेमिनी विद्यार्थ्यांच्या कमकुवत संकल्पना शोधण्यासाठी 'डायग्नोस्टिक क्विझ' घेईल आणि त्यानुसार पर्सनलाइज्ड स्टडी प्लॅन तयार करेल. तसेच सिलॅबसमधील परीक्षेच्या तारखा गुगल कॅलेंडरमध्ये आपोआप ॲड करण्याची सुविधाही लवकरच येणार आहे.


व्हिज्युअल पद्धतीने शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जेमिनी रिअल-टाइम 3D मॉडेल्स आणि सिम्युलेशन तयार करेल.

विद्यार्थी आता बोलून अभ्यास किंवा गृहपाठावरील शंका विचारू शकतात. गुगल ड्राइव्हमधील फाइल्सचे विश्लेषण करून बॅकग्राउंडमध्ये सखोल रिसर्च रिपोर्ट तयार केला जाईल आणि रिपोर्ट पूर्ण झाल्यावर नोटिफिकेशन मिळेल. त्यानंतर विद्यार्थी थेट आवाजाद्वारेच अधिक प्रश्न विचारू शकतील.

# शास्त्रीय गायक पं. कृष्णराव शंकर

महाराष्ट्राबाहेर ग्वाल्हेर या मराठी संस्थानात राहून घरंदाज गायकी जपणार्या कृष्णराव शंकर पंडित यांचा उल्लेख विसाव्या शतकातील 'संगीत भीष्माचार्य' म्हणून केला जातो. ग्वाल्हेर येथे पंडित घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव पार्वतीबाई होते. आपले पिता गायक शंकर पंडित यांच्याकडून कृष्णराव पंडितांना ग्वाल्हेर घराण्याच्या अष्टांग गायकीची तालीम मिळाली. निसार हुसेन खाँसह तत्कालीन अनेक गवैयांचा सहवास त्यांना लाभला.

गायनाबरोबर तबला, पखवाज, सतारही ते शिकले. ख्यालासह धृपद, ठुमरी, होरी, टप्पा, तराणा, त्रिवट, चतुरंग, अष्टपदी, भजन इ. प्रकार ते पेश करत. तीनही सप्तकांत सहज व चपळाईने फिरणारा लवचिक आवाज लाभलेल्या पंडितजींच्या गायकीत दमसांसयुक्त आलापचारी, बेहलावा, गमकेच्या बोलताना, दाणेदार सट्‌ट्याच्या ताना व तालावरची हुकूमतही दिसे. महाराष्ट्रात प्रचलित झालेल्या ग्वाल्हेर घराण्याच्या ख्यालगायकीपेक्षा निराळी, मूलस्रोत मानली जावी अशी जोशपूर्ण व गतिप्रधान गायकी ते गात. त्यांच्या ख्यालगायकीत टप्पा अंग बरेच आढळते. मींड-गमक-बेहलाव्यासह खटका-मुरकी-झमझमा-गिटकडी यांचाही ते प्रचुर वापर करीत.




## निमित्त

त्यांनी ३१ जानेवारी १९१४ रोजी ग्वाल्हेर येथे संगीत विद्यालय सुरू केले. वडिलांच्या स्मृतीनिमित्त १९१७ साली त्याचे नामकरण 'शंकर महाविद्यालय' असे केले. विद्यालयात संगीत शिक्षणाबरोबरच अनेक नामवंत व शिकाऊ कलाकारांच्या मैफली 'गुरुवासरीय सभा'मध्ये होत. त्यांनी १९१२ च्या सुमारास स्वत:ची स्वरलिपी निर्माण केली होती व या लिपीतच त्यांनी पुस्तके लिहिली. त्यांनी संगीत सरगम सार व हार्मोनिअम शिक्षा- २ भाग (१९२४), संगीत प्रवेश- २ भाग (१९२८), संगीत आलाप संचारी (१९३०), सितार और जलतरंग शिक्षा (१९३३), तबला वादन शिक्षा (१९४१) ही पुस्तके प्रकाशित केली. त्यांनी अनेक बंदिशींची रचनाही केली.

१९११-१२ साली सातारा संस्थानने त्यांना राजगायकाचा किताब दिला. त्यांनी १९२५ ते १९३६ या काळात दोनदा ग्वाल्हेर दरबारचे राजगायकपद स्वीकारले व त्यागले. ते १९३६ ते १९४८ या काळात ग्वाल्हेर दरबारचे राजगायक होते.


वयाच्या चौदाव्या वर्षी म्हणजे १९०७ साली पहिली जाहीर मैफल करणाऱ्या पंडितजींनी १९८६ साली वयाच्या ९३ व्या वर्षी सार्वजनिक कार्यक्रमांत गायन थांबवले. मुलतानपासून ढाक्यापर्यंत आणि काश्मीरपासून मद्रासपर्यंत भारतभर त्यांच्या यशस्वी मैफली झाल्या. ते १९४०पासून आकाशवाणीसाठी नियमितपणे गायन करू लागले. कोलंबिया कंपनीने १९४८च्या सुमारास त्यांच्या दोन ध्वनिमुद्रिका काढल्या, यांत ते दरबारी कानडा, गौडसारंग व भैरवी टप्पा गायले होते. एचएमव्हीने १९७२ साली त्यांची जयजयवंती, हमीर व काफी टप्पा अशी दीर्घ ध्वनिमुद्रिका काढली. आकाशवाणीनेही त्यांच्या गायनाचे ध्वनिमुद्रण प्रसिद्ध केले आहे. फिल्म डिव्हिजन ऑफ इंडियाने १९८७ साली 'पंडित कृष्णराव शंकर पंडित' हा चरित्रपट निर्माण केला. भोपाळ येथील भारत भवन या संस्थेने नोव्हेंबर १९८५मध्ये 'कृष्णराव पंडित प्रसंग' हा महोत्सव केला. ग्वाल्हेर येथे वयाच्या शहाण्णवव्या वर्षी वृद्धापकाळ व न्यूमोनियाने या गानमहर्षीचे निधन झाले. **-चैतन्य कुंटे**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# फक्त महिलांनाच नाही, तर पुरुषांनाही होतात मूड स्विंग्स



मूड स्विंग्स हा शब्द ऐकताच आपल्या डोळ्यांसमोर सहसा महिलाच येतात. मासिक पाळी किंवा हार्मोनल बदलांमुळे महिलांमध्ये भावनिक चढ-उतार होतात हा एक सर्वमान्य समज आहे, पण हाच भावनिक गोंधळ पुरुषांमध्येही होतो ही वस्तुस्थिती अनेकदा दुर्लक्षित केली जाते. पुरुषांच्या मूड स्विंग्सला 'चिडचिडेपणा' किंवा 'राग' समजून त्याकडे कानाडोळा केला जातो.

खरेतर मूड स्विंग्स हा एक सार्वत्रिक मानवी अनुभव आहे आणि पुरुषही याला अपवाद नाहीत. शारीरिक, हार्मोनल आणि मानसिक कारणांमुळे त्यांच्यातही भावनिक चढ-उतार येतात, जे त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनावर खोलवर परिणाम करतात. पुरुषांमधील मूड स्विंग्समागे अनेक शारीरिक आणि जीवनशैलीशी संबंधित कारणे असू शकतात, असे तज्ज्ञ सांगतात. टेस्टोस्टेरॉनची घट हे सर्वात प्रमुख कारण आहे. विशेषतः, वयाच्या तिशीनंतर पुरुषांमध्ये टेस्टोस्टेरॉन या हार्मोनची पातळी हळूहळू कमी होऊ लागते. यामुळे चिडचिड, थकवा आणि नैराश्य यासारखी लक्षणे दिसू शकतात. या स्थितीला 'अँड्रोपॉज' असेही म्हणतात.

कामाचा दबाव, आर्थिक चिंता आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळेही तणावाची पातळी वाढते, ज्यामुळे मूडमध्ये वारंवार बदल होतात. पुरेशी झोप न मिळाल्यास हार्मोन्सचे संतुलन बिघडते आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. खराब आहार, मद्यपानाचे अतिसेवन आणि बैठी जीवनशैली या समस्येला आणखी वाढवू शकते. पुरुषांमधील मूड स्विंग्सची लक्षणे अनेकदा महिलांपेक्षा वेगळ्या प्रकारे दिसून येतात.

महिलांमध्ये उदासी किंवा रडण्याचे प्रमाण जास्त दिसू शकते, तर पुरुषांमध्ये ते चिडचिड आणि अचानक राग येणे, सततचा थकवा, पूर्वी आवडणाऱ्या गोष्टींमध्ये किंवा कामांमध्ये मन न लागणे, झोप न लागणे किंवा खूप जास्त झोप येणे, कोणत्याही कामावर लक्ष केंद्रित करण्यात अडचण येणे, भूक कमी लागणे किंवा प्रमाणापेक्षा जास्त खाणे अशा लक्षणांमधून दिसते. जर कोणामध्ये ही लक्षणे सातत्याने दिसत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

# वडखळ परिसरात बोगस डॉक्टरला अटक

## गटविकास अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांची संयुक्त कारवाई

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एल.अँड.टी. कॉलनी सालिंदे येथे वैद्यकीय अर्हता नसताना डॉक्टर असल्याचे भासवून रुग्णांची तपासणी करून त्यांना औषधे व इंजेक्शने देणाऱ्या बोगस बंगाली डॉक्टरवर पेणच्या गटविकास अधिकारी व वैद्यकीय अधिकारी गडब यांनी संयुक्त कारवाई केली. यावेळी आरोपी दीपकर सुशांत दास (मूळ रा. चक, जितीकापोटा, वेस्ट बंगाल) याला वडखळ पोलिसांच्या ताब्यात देऊन त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत माहिती अशी कि, १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास HPR ID बनविण्यासाठी तपासणी सुरू असताना एल.अँड.टी. कॉलनी सालिंदे येथील पडीक पत्र्याच्या शेडमध्ये दिपकर दास हा बोगस डॉक्टर बेकायदेशीरपणे दवाखाना सुरू करून इंजेक्शन व औषधांचा साठा बाळगताना आढळून आला. गटविकास अधिकारी लेंडी व वैद्यकीय अधिकारी चेतन मोकल यांच्या कडून त्याची विचारपूस सुरू असताना तो पळून जाण्याच्या प्रयत्न केले असता त्याला पुन्हा पकडले. सदर बोगस बंगाली डॉक्टरला वैद्यकीय शिक्षण विचारले असता त्याच्याकडे कोणतीही वैद्यकीय अर्हता नसतानाही तो स्वतःला डॉक्टर असल्याचे भासवत रुग्णांची तपासणी करून त्यांना औषधे व इंजेक्शन देत होता तसेच रुग्णांकडून अवाढव्य फीच्या स्वरूपात मोबदला घेऊन गैरलाभ मिळवत होता. त्याची सखोल चौकशी केली असता तो कलकत्ता येथे कंपाउंडरचे काम करत असल्याचे त्याने सांगितले. यावेळी वडखळ पोलिसांना पाचारण करत सदर आरोपीला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

कारवाईत एकूण ५४ हजार ६१४ रुपये किमतीचा इंजेक्शन व औषधसाठा जप्त करत दवाखान्यासाठी लागणारा साहित्य ताब्यात घेण्यात आले. सदर धडक कारवाई ही पेण गटविकास अधिकारी गजानन लेंडी, गडब वैद्यकीय अधिकारी डॉ. चेतन अविनाश म्हात्रे, आरोग्य सहाय्यक दिपक पुंडलिक म्हात्रे, गणपत जानू वारगूडे, उल्हास हिराजी म्हात्रे, सागर सुनील पाटील, पोलीस कॉन्स्टेबल ठाकूर यांच्या पथकाने केली.

प्राथमिक आरोग्य केंद्र गडब येथील वैद्यकीय अधिकारी चेतन अविनाश म्हात्रे यांनी याबाबत लेखी फिर्याद दिली असून वडखळ पोलीस ठाण्यात बंगाली बोगस डॉक्टर दिपकर दासवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक श्रीमती सांगळे या पुढील तपास करीत आहेत.

# आपटा येथील वन विभागाच्या जमीन विक्रीप्रकरणी गुन्हा दाखल

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आपटा गाव येथे वन विभागाच्या मालकीची जमीन स्वतःची असल्याचे भासवून खाजगी व्यक्तीला विक्री केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आपटा गावातील सर्व्हे क्रमांक ४१ ब, क्षेत्र १.३० हेक्टर ही जमीन वन विभागाच्या अभिलेखानुसार महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) कायद्यानुसार शासनाच्या मालकीची आहे. मात्र, गंगाधर नारायण बिवलकर व यशवंत नारायण बिवलकर (रा. पुणे) यांनी सदर जमीन स्वतःच्या मालकीची असल्याचे सांगून तसेच ती विक्री करण्याचा अधिकार असल्याचे भासवून एका खाजगी व्यक्तीला विक्री केल्याचा आरोप आहे.

या प्रकारामुळे वन विभागाची तसेच शासनाची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्याने वनरक्षक भाऊसाहेब रतन जवरे यांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून गंगाधर नारायण बिवलकर व यशवंत नारायण बिवलकर यांच्याविरुद्ध फसवणुकीच्या प्रकरणाते कारवाई करण्यात आली आहे.रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.

# हरवलेले १८ मोबाईल खालापूर पोलिसांनी मूळ मालकांना केले परत



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलिसांनी हरवलेले, चोरी झालेले मोबाईल शोधून पुन्हा मूळ मालकाना परत दिल्याने खालापूर पोलिसांच्या कामगिरीवर मोबाईल मालक खुष झाले आहेत.

खालापुर पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रातून स्थानिक व बाहेरील नागरीक यांचे मोबाईल गहाळ झाले बाबत पोलीस स्टेशनला तक्रारी दाखल झालेल्या होत्या. गहाळ झालेल्या मोबाईल हॅन्डसेटचा तत्परतेने शोध होणेकरीता CEIR या कार्यप्रणालीचा वापर करुन या कार्यप्रणालीच्या माध्यमातून ३,०४,२९९/- रुपये किमतीचे एकुण १८ मोबाईल हॅन्डसेट हस्तगत केले. गहाळ झालेले मोबाईल हॅन्डसेट हे रायगड जिल्हयात, महाराष्ट्रात व इतर राज्यात असल्याचे सदर कार्यप्रणालीच्या माध्यमातून माहीती मिळवण्यास पोलीसांना यश आले. त्या कार्यप्रणालीच्या माध्यमातुन मोबाईल हॅन्डसेटचा तपास लागला आहे.

उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ विशाल नेहल,. सहायक पोलीस निरिक्षक संदीप शिंगटे यांच्या उपस्थितीत CEIR या कार्यप्रणालीच्या माध्यमातून मिळून आलेले एकुण १८ मोबाईल हॅन्डसेट मुळ मालकांना सुस्थितीत वाटप करण्यात आले.नागरीकांनी या कौतुकास्पद कामगिरीबाबत समाधानी होऊन पोलीसांचे आभार व्यक्त केले सदरची कौतुकास्पद कामगिरी ही रायगड जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्रीमती आँचल दलाल,अपर पोलीस अधीक्षक, अभिजीत शिवथरे, उपविभागिय पोलीस अधिकारी, डॉ. विशाल नेहूल यांचे मार्गदर्शनाखाली खालापुर पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरिक्षक संदीप शिंगटे, पोहवा मोरे, पोशि मोरे यांनी केलेली आहे.

# भिसेगाव आणि किरवली शाळांना मिळाली डिजिटल शिक्षणाची जोड

**कर्जत : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कोरेडू सिड फॉउंडेशनच्या वतीने रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा भिसेगाव अंतर्गत भिसेगाव आणि किरवली या शाळांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी ६५ ईंची स्मार्ट टीव्ही भेट देऊन विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली.



याप्रसंगी कोरेडू सिड फॉउंडेशनच्या संस्थापक व संचालक कांचन थोरवे व सुधीरकुमार गजभिये, वरिष्ठ समन्वयक स्वप्नील गायकवाड,सहाय्यक समन्वयक माधुरी भोपत्राव, क्लस्टर हेड महेश खाडे, नगरसेविका राधिका पवार, भास्कर थोरवे, माजी सरपंच दत्तात्रेय सांबरी,पोलीस पाटील विवेक बडेकर आदी उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत भिसेगावमधील ६४ आणि किरवलीमधील ११० अशा एकूण १७४ विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, स्टील वॉटर बॉटल, नोटबुक्स, स्टेशनरी, ड्रॉइंग बुक व रंगसाहित्य देण्यात आले. दोन्ही शाळांना ६५ इंची स्मार्ट टीव्ही आणि डिजिटल शैक्षणिक अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आला. त्यामुळे वर्गातील अध्यापन अधिक दृक्-श्राव्य, सुलभ आणि अनुभवाधारित होण्यास मदत होणार आहे.

उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासोबत शिक्षकांच्या अध्यापन पद्धतीतही सकारात्मक बदल घडविण्यावर भर दिला जात आहे. संस्थेच्या विविध उपक्रमांचा आतापर्यंत २७५७ हून अधिक विद्यार्थी आणि ८६ शिक्षकांना लाभ झाला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला जात आहे.यामध्ये शैक्षणिक विकास, वाचन संस्कृती,शिक्षकप्रशिक्षण, प्रकल्पाधारितवअनुभवाधारित शिक्षण,मेंदूविकास,योग,संगणक कौशल्य उपक्रमांचा समावेश आहे.

# नारळ फोडीच्या पारंपरिक खेळातून संस्कृतीचा जागर

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील रामनाथ येथे श्री रामनाथ गावदेवी मंदिराच्या प्रांगणात पारंपरिक नारळ फोडीच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. भाजपा रामनाथ विभागप्रमुख अजिंक्य शेवडे तसेच शगीर शेख आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारातून झालेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या पारंपरिक स्पर्धेला नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा यांनी उपस्थित राहून सहभाग घेतला. भाजपाचे आमदार प्रमोद जठार ही या कार्यक्रमाला उपस्थित होते.मोबाईल, सोशल मीडिया आणि रील्सच्या युगात आपल्या मातीतले पारंपरिक खेळ, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. अ असे नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा म्हणाले.यावेळी नगरसेविका संध्या पाळवणकर, भाजपा महिला प्रमुख पल्लवी जोशी, शहर सचिव मानस कुंटे, निखिल चव्हाण, सुनील दामले, अशोक वारगे, आदित्य जैन, मयुरेश जोशी, रोशन भगत उपस्थित होते.

# तळा येथील हिरकणी कक्ष, स्वच्छतागृह उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

**तळा : प्रतिनिधी**

तळा एस टी बस स्टँड वर बांधण्यात आलेले स्वच्छता गृह व महीला बालकल्याण विभागाकडून उभारण्यात आलेल्या हिरकणी कक्ष उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहेत.स्वचछतागृहाचे बांधकामात दिरगांई झाली जवळपास दोन वर्षाचा कालावधी लोटला पत्रकार बंधूनी वृतपत्राचे माध्यमातून लक्ष वेधले काम पुर्ण झाले मग उद्घाटनाला मुहूर्त कधी लागणार ? स्वच्छतागृह सुरु न झाल्याने महीला वर्गाची कुचंबणा होत आहे.



स्वचछता गृह बंद असल्याने व प्रवासी वर्ग,जेष्ठ महीला,नागरिक वयोवृद्ध नागरिकांना,चालक,महीला वाहक, विद्यार्थी यांना लघुशंकेला जाता येत नाही. स्वच्छता गृह बंद आहे.ते त्वरीत सूरू करावे अशी अपेक्षा आहे.हिरकणी कक्ष सुसज्ज सोयीने असून महींलाना बालकांना स्तनपान देण्यासाठी सुरक्षित जागा असून त्याचेही उद्घाटन न झाल्याने अडचण निर्माण झाली आहे. सणावाराचे दिवस गोकुळाष्टमी गौरी गणपती सण प्रवाशांची वर्दळ वाढणार असल्याने लवकरात लवकर सुरु करावे अशी मागणी केली जात आहे.

# 'पोस्को'कडून ८९ शाळांमध्ये २,००९ शालेय संचांचे वितरण

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक सुकर व्हावा आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्याला गती मिळावी, या उद्देशाने पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या CSR उपक्रमांतर्गत यंदाही दफ्तर आणि शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम हाती घेतला. गेल्या चार वर्षांची यशस्वी परंपरा कायम राखत कंपनीने या वर्षी माणगाव तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रम राबवला. आत्तापर्यंत एकूण ५७१६ शालेय साहित्य संच वितरीत केले आहेत.

वाढती महागाई आणि ग्रामीण भागातील गरजा लक्षात घेऊन कंपनीने यंदा माणगाव तालुक्यातील ८९ शाळांमधील विद्यार्थ्यांना एकूण २,००९ शालेय साहित्य संच अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने वितरित केले. या मदतीमुळे पालकांना आर्थिक दिलासा मिळाला असून विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह पाहायला मिळत आहे.

या उपक्रमांतर्गत केवळ साहित्य देण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजांचा अभ्यास करून संच तयार करण्यात आले होते. यामध्ये दप्तर, वह्या, अंकलिपी, १२ पेन्सिलचा संच, पट्टी, रबर, शार्पनर, रंगीत पेन्सिल, चित्रकला वही, स्टीलची पाण्याची बाटली, गिरवायची पाटी यांसारख्या आवश्यक वस्तूंचा समावेश होता.

या उपक्रमात सहभागी झालेल्या शिक्षकांनी आणि मुख्याध्यापकांनी पोस्कोच्या या संवेदनशील प्रयत्नांचे मनापासून स्वागत केले. "ग्रामीण भागात अनेकदा योग्य साधनांअभावी मुलांच्या शिक्षणात अडथळे येतात. अशा वेळी पोस्कोसारख्या जबाबदार कंपनीने पुढे येऊन केलेली ही मदत विद्यार्थ्यांचा अभ्यासामधील रस आणि आत्मविश्वास दोन्ही वाढवणारी ठरत आहे," अशी प्रतिक्रिया यावेळी शिक्षकांनी व्यक्त केली.

# ज्येष्ठ नागरिक संघातर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, छत्री वाटप



**नागोठणे : बातमीदार**

पालकांनी आपली मानसिकता बदलून आपल्या पाल्यांच्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. आजच्या काळात इंग्रजी भाषा शिकणे ही गरज असली, तरी मराठी ही आपली मातृभाषा असून तिला राज्यभाषेचा दर्जा प्राप्त आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांना मराठीतून शिक्षण देण्यास प्राधान्य द्यावे. रायगड जिल्ह्यात मराठीतून शिक्षण घेऊन अनेक विभूती घडल्या आहेत. आजच्या विद्यार्थ्यांमधूनही भविष्यात अनेक कर्तृत्ववान व्यक्ती घडू शकतात, असे प्रतिपादन ज्येष्ठ नागरिक संघ नागोठणेचे अध्यक्ष महादेवसिंग परदेशी यांनी केले.

नागोठणे येथील माहेरवासीनी कै. श्रद्धा हरी वैद्य उर्फ पुष्पा साठे व कै. वर्षा पाटणकर उर्फ माधुरी साठे यांच्या स्मरणार्थ हरी वैद्य व ज्येष्ठ नागरिक संघ नागोठणे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. २१ ऑगस्ट) रजिप कचेरी शाळा येथे शैक्षणिक साहित्य, छत्री व खाऊ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागोठणे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील एकूण ७२ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, छत्री व खाऊचे वाटप करण्यात आले. आजचे युग मोबाईलचे असले तरी विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या अतिवापरापासून दूर राहिले पाहिजे. विद्यार्थ्यांनी मैदानी खेळ, वाचन आणि विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यावर भर दिला पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. मिलिंद धात्रक, उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, उपाध्यक्ष बना मोदगी, सचिव उल्हास शिंदे, खजिनदार दिलीप शहासने, केंद्रप्रमुख सुनील मोंढे, ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया काकडे, पुनम काळे, अमृता महाडिक, भाविका गिजे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सुगंधा पिंपळे, मुख्याध्यापिका समा शेळके, विजया धनावडे, कल्याणी चौरे, शिक्षिका ज्योती सैंदाणे, दत्ता कडव, सुभाष भोय, सोनू जोशी आदी उपस्थित होते.


**कुळगांव बदलापूर नगर परिषद**

नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल : coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट : http://kbmc.gov.in

संदर्भ : कुबनप/नगरोत्थांन/साबां./७४३/२०२६-२७ दिनांक :- २१/०८/२०२६

**फेर जाहीर ई - निविदा सूचना क्र. ०५/२०२६-२७**

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत सन २०२६-२७ करिता प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या ०१ विकास कामासाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.२२/०८/२०२६ ते दि.२३/०८/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून दि. २४/०८/२०२६ रोजी दुपारी. १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई-निविदा दि ३१/०८/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/-
**(मारुती गायकवाड)**
मुख्याधिकारी,
कुळगांव बदलापूर नगरपरिषद



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे खानाव, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं. / हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मलाकाचे नाव |
|---|---|---|---|
| १०७/२/अ | ००-८५-०० | २.४५ | श्री. गणु जैतू मुंढे<br>श्री. रघुनाथ जैतू मुंढे<br>श्री. अनंता जैतू मुंढे<br>श्री. बाळ उर्फ बाळाराम जैतू मुंढे<br>श्रीमती मंजुळा परशुराम जाधव<br>श्रीमती अलका परशुराम जाधव उर्फ अलका बाळाराम तवले<br>श्रीमती मुक्ता जैतू मुंढे उर्फ मुक्ता शंकर देसले |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २१/०८/२०२६.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१



**CHANGE OF NAME**

I the undersigned **Mr. Tamim Ahmed Munir Jamadar** (Old name) residing at A/P **- Mhasala, Tal. Mhasala, Dist. Raigad. Pin - 402105. Maharashtra State.**

My Old Name **(Tamim Ahmed Munir Jamadar)** By Mistake printed on my old passport. So that i Changed my name by the Affidavit No. **265204184126860010210 9 dated 21 August 2026.** So that I remitter issue may here after be called by new name **Mr. Tamim Munir Jamadar**

Sign. by New Name
**Tamim Munir Jamadar**



**पनवेल महानगरपालिका**
**ता.पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल - ४१०२०६.**

**-: जाहीर सूचना :-**

**विषयः- सार्वजनिक गणेशोत्सव मंडप परवानगी व तद्अनुषंगीक पुर्वनियोजनकामी बैठकीबाबत.**

**संदर्भः- जनहित याचिका क्र. १७३/२०१० मध्ये मे. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश.**

गणेशोत्सवानिमित्त कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये व त्या दृष्टीने उपाययोजना करणेकामी गणेशोत्सव मंडळांना Online पध्दतीने एक खिडकी योजना अमंलात आणुन http://smartpmc.in/Login ही वेबसाईट तयार करणेत आली आहे. जनहित याचिका क्र. १७३/२०१० (डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर संदर्भाता मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशासन अनुसरुन पनवेल महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवानिमित्त उभारण्यात येणारे मंडप/स्टेज/ कमानी इत्यादींबाबत सविस्तर कार्यपध्दती (S.O.P.) तयार केली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार मार्गदर्शक सुचना देणेकामी, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात येत्या आगामी कालावधीत साजरा होणाऱ्या **"सार्वजनिक गणेशोत्सव २०२६"** करीता उत्सव साजरा करणारे संबंधित मंडळ/ संस्था/ व्यक्ती इत्यादी समवेत पनवेल महानगरपालिका हद्दीतील शासकीय अधिकारी / कर्मचारी (उपविभागीय अधिकारी, पनवेल, तहसिलदार पनवेल, पोलिस उपायुक्त, नवी मुंबई, व महानगरपालिका हद्दीतील सर्व वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मा. उपआयुक्त वाहतुक विभाग, नवी मुंबई, मा. पोलीस निरिक्षक वाहतुक विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अधिक्षक / अभियंता व इतर) संबंधित अग्निशमन अधिकारी आणि सर्व संबंधित प्रभागक्षेत्र अधिकारी यांची संयुक्त बैठक **दिनांक २५/०८/२०२६ रोजी वेळ सायंकाळी ०५.०० वाजता आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल** या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. तरी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात **"सार्वजनिक गणेशोत्सव २०२६"** करीता उत्सव साजरा करणारे सर्व संबंधित मंडळ/संस्था/ व्यक्ती यांनी **दिनांक २५/०८/२०२६ रोजी वेळ सायंकाळी ०५.०० वाजता आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल** या ठिकाणी आयोजित बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे.

दि. २१/०८/२०२६.

सही/-
**(रविकिरण घोडके)**
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२
६/प्र.क्र.२६७/२८८/२०२६

# नवी मुंबईत स्मार्ट शौचालये बांधण्याचा सागर नाईक यांचा प्रस्ताव

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईची वाढती लोकसंख्या आणि नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन, आता आधुनिक सुविधांनी सुसज्ज सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालये बांधली जाणार आहेत. गुरुवारी, नवी मुंबई महानगरपालिकेचे सभागृह नेते, सागर नाईक यांनी महासभेत शहरातील सार्वजनिक शौचालयांसाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावानुसार, लोकसंख्या, दररोज शौचालये वापरणाऱ्यांची संख्या आणि परिसराच्या गरजा यांवर आधारित नवीन शौचालये बांधण्याची आणि विद्यमान शौचालयांचे आधुनिकीकरण करण्याची योजना आखण्यात येणार आहे. सभेतील चर्चेनंतर, प्रशासनाला सविस्तर अभ्यास करून एक योजना तयार करण्याचे आणि पुढील महिन्यात होणाऱ्या सभेच्या बैठकीत हा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

प्रस्तावानुसार, नवीन शौचालयांमध्ये महिला, पुरुष, मुले आणि दिव्यांगांसाठी स्वतंत्र सुविधा असतील, तसेच पुरेसे पाणी, हात धुण्याची सोय, सुधारित प्रकाश व्यवस्था, हवा खेळती राहण्याची सोय, सुरक्षित प्रवेश आणि स्वच्छता या सुविधाही उपलब्ध असतील. रेल्वेस्थानके, बस स्थानके, बाजारपेठा, उद्याने, समुद्रकिनारे, पर्यटन स्थळे, दाट लोकवस्तीचे भाग आणि झोपडपट्ट्या या ठिकाणी गरजेनुसार शौचालयांची क्षमता निश्चित केली जाईल. शिवाय, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांच्यावर देखरेख ठेवली जाईल. सेन्सर-आधारित नळ आणि फ्लशिंग, दुर्गंधी नियंत्रण, पाणी वाचवण्याची तंत्रे, क्यूआर कोडद्वारे नागरिकांच्या तक्रारी आणि अभिप्राय, डिजिटल स्वच्छता नोंदी, जीपीएस-आधारित स्थान नोंदणी आणि एक केंद्रीय देखरेख प्रणाली यांसारख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केला जाईल.

या प्रस्तावात शहरातील सर्व सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालयांसाठी एकसमान रचना, रंग, बोधचिन्हे, बांधकाम साहित्य आणि स्वच्छतेच्या मानकांची मागणी देखील करण्यात आली आहे. नियमित तपासणी, देखभाल, त्रयस्थ पक्षाकडून गुणवत्ता तपासणी आणि सेवा-स्तरावरील मानकांचीही शिफारस करण्यात आली आहे. सविस्तर अभ्यासानंतर प्रशासनाकडून तयार करण्यात येणाऱ्या या योजनेत बांधकाम आणि दीर्घकालीन संचालन व देखभाल या दोन्हींचा समावेश असेल.

## विद्यार्थ्यांना नशामुक्ती अभियानांतर्गत मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**



प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय आयोजित "नशा मुक्त महाअभियान"अंतर्गत ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे प्रसिद्ध डॉक्टर्स बी.के. विजया, डॉ, समिधा राव आणि डॉ, अर्चना कान्हेरे यांनी विद्यार्थ्यांना नशा पान विषयी मार्गदर्शन केले. संपूर्ण भारत हा नशा मुक्त झाला पाहिजे त्यासाठी १० करोड तरुणांना नशा मुक्त करणे आमचे उद्दिष्ट आहे. ते उद्दिष्ट आम्हाला २० ऑगस्ट पूर्वी पूर्ण करायचे आहे. आतापर्यंत अडीच करोड विद्यार्थ्यांनी नशा मुक्तीची शपथ घेतलेली आहे. कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप कांबळे , पंडित आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिल पाटील यांनी केले.

## सीए परीक्षेसाठी मार्गदर्शन शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

शिरवणे विद्यालय व जुनिअर कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिरवणे विद्यालयात इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटिंग ऑफ इंडिया यांच्या माध्यमातून सनदी लेखापाल (सीए) परीक्षेच्या तयारी साठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात



आले होते. या शिबिराला सीए शुभांगी जाधव आणि सीए जागृती साहू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी शिरवणे विद्यालयाच्या प्राचार्या भाग्यश्री चौधरी, संस्थेचे समन्वयक मनोज वाघचौरे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. १०वी आणि १२वी च्या विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला

यावेळी डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले की, "सध्याच्या स्पर्धेच्या युगात १०वी, १२वी झाल्यानंतर काय करावं? हे विद्यार्थ्यांना कळलं पाहिजे.



**अलिबाग : दै. नवराष्ट्र रायगड सन्मान सोहळ्यात खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम यशवंत साबळे यांना आदर्श उपनगराध्यक्ष पुरस्कार देऊन पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.**

# गव्हाण विद्यालयात सखी सावित्री समिती सहविचार सभा

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी सखी सावित्रीसमितीची सहविचार सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सुरक्षितता, आरोग्य, पोषण आणि वैयक्तिक विकासाच्या दृष्टीने या सभेत विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

सभेच्या सुरुवातीस सखी सावित्री समितीच्या विभागप्रमुख हर्षला पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेच्या उद्देशाची माहिती दिली. मुलींच्या सर्वांगीणविकासासाठी सखी सावित्री समितीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.सभेत प्रामुख्याने मुलींचे शिक्षण व शाळेतील नियमित उपस्थिती, मुलींची सुरक्षितता, गुड टच-बॅडटच व वैयक्तिक सुरक्षितता तसेच मुलींचे आरोग्य व पोषण या चार महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तरविचारमंथन करण्यात आले.यावेळी विद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापिका सौ. करुणा तांडेल यांनीविद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घ्यावयाच्या काळजीबाबत सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनीकोणत्याही प्रकारच्या अडचणी किंवा असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्यास विश्वासातील व्यक्तींशी संवादसाधणे, योग्य वेळी मदत घेणे आणि स्वतःच्या सुरक्षिततेबाबत जागरूक राहणे यांचे महत्त्व त्यांनी स्पष्टकेले.

सखी सावित्री समितीच्या विभागप्रमुख सौ. हर्षला पाटील यांनी 'गुड टच-बॅड टच' तसेच वैयक्तिकसुरक्षितता या विषयावर उपस्थित महिला शिक्षिकांशी हितगुज केले. विद्यार्थिनींना सुरक्षिततेबाबतमार्गदर्शन करताना शिक्षिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, विद्यार्थिनींशी विश्वासाचे आणिआपुलकीचे नाते निर्माण करून त्यांच्या समस्या समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.विद्यार्थिनींना योग्य पद्धतीने मार्गदर्शन कसे करावे, त्यांच्या अडचणींकडे संवेदनशीलतेने कसे पाहावेआणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी शिक्षिका म्हणून कोणती भूमिका बजावता येईल, यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

विद्यालयाच्या पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांनी विद्यार्थिनींच्या आरोग्य, पोषण, सुरक्षितताआणि मानसिक व भावनिक गरजा या सर्वच बाबींवर मार्गदर्शन केले. मुलींच्या आरोग्याकडे सातत्याने लक्षदेणे, त्यांना पोषणाचे महत्त्व समजावून सांगणे तसेच शाळेत त्यांच्यासाठी सुरक्षित व विश्वासपूर्णवातावरण निर्माण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.या सहविचार सभेसविद्यालयाच्या प्राचार्या सौ. ज्योत्स्ना ठाकूर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील,ज्येष्ठ प्राध्यापिका.करुणा तांडेल, ज्येष्ठ शिक्षिका रंजिता पाटील तसेच विद्यालयातील सर्वमहिला शिक्षिका उपस्थित होत्या.

# उरण तालुक्यात माझा गट, माझं कुटुंब प्रशिक्षणाला सुरुवात

**उरण : प्रतिनिधी**



सत्यमेव जयते फार्मर्स कप २०२६ अंतर्गत पाणी फाउंडेशन, कृषी विभाग आणि उमेद अभियान यांच्या वतीने उरण तालुक्यातील शेतकरी गटांसाठी 'माझा गट, माझं कुटुंब' या विशेष प्रशिक्षणाचे आयोजन चिरनेर येथील ग्रामपंचायत कार्यालयात काल २१ जुलै रोजी करण्यात आले होते. या प्रशिक्षणात उरण तालुक्यातील विविध शेतकरी गटांमधील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. या प्रशिक्षणात एकट्याने शेती करणे दिवसेंदिवस आव्हानात्मक होत असतांना, गटाने शेती करणे हे समृद्धीकडे जाण्याचे पायाभूत पाऊल ठरू शकते, या मुख्य विचारावर प्रशिक्षणाची मांडणी करण्यात आली.एकट्या शेतकऱ्याला भेडसावणाऱ्या मजूर, यंत्रसामग्री, भांडवल, तंत्रज्ञान, उत्पादन विक्री आणि बाजारपेठेच्या अडचणींबाबत या प्रशिक्षणाद्वारे कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

शेतकरी गटाच्या माध्यमातून सामूहिक नियोजन, सामूहिक खरेदी, यंत्रसामग्रीचा सामूहिक वापर, ज्ञानाची देवाणघेवाण, उत्पादनाचे एकत्रित व्यवस्थापन आणि बाजारपेठेशी सामूहिक जोडणी केल्यास शेतीतील खर्च कमी करून उत्पन्नाच्या संधीत वाढ करता येते. याबाबतचे देखील मार्गदर्शन या प्रशिक्षणातून करण्यात आले.

'माझा गट, माझं कुटुंब' या संकल्पनेतून गटातील प्रत्येक सदस्याने केवळ स्वतःच्या शेताचा विचार न करता संपूर्ण गटाच्या प्रगतीचा विचार करावा, गटातील प्रत्येक सदस्याच्या अडचणीत एकमेकांनी साथ द्यावी आणि सामूहिक प्रयत्नातून गटाची आर्थिक प्रगती साधावी, असाही संदेश या प्रशिक्षणाला भेट देण्यासाठी आलेल्या पाणी फाउंडेशनच्या राज्य समन्वयक देशमुख आणि रायगड जिल्हा समन्वयक प्रणय गोरीवाले यांनी दिला.यावेळी त्यांनी प्रशिक्षणाची पाहणी करून शेतकरी गटांशी उत्स्फूर्त संवाद साधून, गटशेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी सामूहिक प्रगती साधण्याचे आवाहन केले.

या प्रशिक्षणा दरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या शेतीतील अनुभव व अडचणी मांडल्या. 'एकट्याने शेती करण्यापेक्षा एकत्र येऊन शेती केल्यास आव्हानांचे रूपांतर संधीमध्ये करता येते,हा विचार प्रशिक्षणातून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.सत्यमेव जयते फार्मर्स कप २०२६ च्या माध्यमातून उरण तालुक्यातील शेतकरी गटांना अधिक सक्षम, स्वावलंबी आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध करण्याच्या दिशेने 'माझा गट, माझं कुटुंब' प्रशिक्षण महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. याप्रसंगी मंडळ कृषी अधिकारी शुभम गटकळ, उप कृषी अधिकारी अलका बरकुल, कृषी सहाय्यक अधिकारी अधिक पानसरे, कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड, कृषी सहाय्यक अधिकारी विभावरी चव्हाण, कृषी सहाय्यक अधिकारी सुरज घरत, बी टी एम नमिता वाकळे यांच्यासह मोठ्या संख्येने तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा

**मोहोपाडा :** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळावे आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने राज्यभर गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. याच उपक्रमांतर्गत आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा उत्साहात पार पडला.यावेळी इयत्ता दहावी, बारावी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र, वह्या व पेन देऊन गौरव करण्यात आला.

रामप्रहर

## श्रावणधारा

### पाऊस..

त्याची द्यावयास वर्दी..
येती कृष्णमेघी थेंब..
आतुरले आसुसले..
सारे बीजातील कोंब..

वीज तोरण लावून..
मग बरसल्या सरी..
गंध मातीचा पसरे..
परसात बांधावरी..

ओलीचिंब भिजलेली..
गाते धरणी खुशीत..
हासे नांगराच्या संगे..
घेई बियाणे कुशीत..

दरी डोंगर भिजले..
वाहे पाणी खळाळून..
कडे कपारीवरून..
देई आनंदे झोकून..

आनंदाने बागडती
मुले अंगणी भिजत
नाव करून कागदी
कशी पाण्यात सोडत

ओथंबले पानपान..
चोहीकडे हिरवाई ..
आनंदली सृष्टी सारी..
मिरवत नवलाई..



-संदीप जोशी
सौदी अरेबिया

# नारळी पौर्णिमेच्या स्वागतासाठी कोळीवाडे सज्ज

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोळी समाजाच्या सागरी जीवनाशी आणि संस्कृतीशी अतूट नाते सांगणारा नारळी पौर्णिमा उत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, मुंबईसह नवी मुंबईतील कोळीवाड्यात या उत्सवाची लगबग आतापासूनच सुरू झाली आहे. सणाच्या आठवडाभर आधीपासूनच कोळी बांधवांच्या उत्साहाला उधाण आले असून, संपूर्ण कोळीवाडा सणाच्या तयारीत मग्न झाला आहे.

नारळी पौर्णिमा हा कोळी समाजासाठी केवळ धार्मिक सण नाही, तर समुद्राशी असलेले नाते, पूर्वजांनी जपलेल्या परंपरा आणि आपल्या सागरी संस्कृतीचा अभिमान व्यक्त करणारा भावनिक सोहळा आहे. त्यामुळे या सणाची चाहूल लागताच कोळी बांधवांमध्ये एक वेगळाच उत्साह संचारतो. या सणाच्या पार्श्वभूमीवर कोळी बांधव आपल्या होड्यांना रंगरंगोटी करून त्यांना नवे रूप देत आहेत. कुठे होड्यांवर आकर्षक रंग चढविले जात आहेत, तर कुठे त्यांच्या दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

यावेळी बंदरकिनारी रंगीबेरंगी पताका, झेंडे आणि फुलांच्या सजावटीने होड्या सजवल्या जात असून, समुद्रकिनाऱ्यावर एक वेगळेच चैतन्य पाहायला मिळत आहे. तर, कोळीवाड्यात अनेक ठिकाणी कोळी गीतांच्या नृत्याचे सराव सुरु असून, लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकाच्या चेहऱ्यावर सणाचा एक वेगळा आनंद दिसून येत आहे. त्यामुळे अनेकांच्या मनात समुद्रदेवतेप्रती कृतज्ञता आणि आपल्या पूर्वजांच्या आठवणी दाटून येतात.

"समुद्र आमचा सखा, होडी आमची सोबती आणि नारळी पौर्णिमा आमचा अभिमान" या भावनेतून 'नारळ सोन्याचा, दिवाळे गावाचा' हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार असून, यंदाही सिद्धी मित्र मंडळ, दिवाळे कोळीवाडा व ग्रामस्थ यांच्या पुढाकाराने नारळी पौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाच्या निमित्ताने कोळी समाजाची पारंपरिक संस्कृती, सागरी जीवनशैली आणि पिढ्यान्पिढ्या जपलेल्या परंपरांचे दर्शन घडणार असल्याचे सिद्धी मित्र मंडळाच्या आयोजकांनी यावेळी सांगितले.

# ओएनजीसी वसाहतीची पुनर्बांधणी करावी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सीबीडी बेलापूर सेक्टर १ येथील ओएनजीसीच्या निवासी वसाहतीची अवस्था बिकट असून सदर जागेची पुनर्बांधणी करावी अशी मागणी होत आहे.



सीबीडी बेलापूर सेक्टर १मधील ओएनजीसीचे निवासी संकुल अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असून त्या परिसरातील इमारती भग्न, ओसाड आणि धोकादायक स्थितीत उभ्या आहेत. इथ वाढलेली झाडे-झुडपे, साचलेला कचरा आणि मोडकळीस आलेल्या इमारतींमुळे संपूर्ण परिसर असुरक्षित बनला आहे.सदर परिसरात अंधार, निर्जन वातावरण आणि अस्वच्छता वाढल्याने कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी या जागेची तातडीने पाहणी करून सुरक्षा उपाययोजना कराव्यात . नवी मुंबईमध्ये वाढती लोकसंख्या, सार्वजनिक सुविधा आणि पायाभूत प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात जमिनीची गरज निर्माण होत असताना एवढा मोठा भूखंड निष्क्रिय राहणे अयोग्य आहे. योग्य नियोजनाद्वारे या जागेचा नागरिकाभिमुख विकासासाठी प्रभावी वापर होऊ शकतो असे नागरिकांचे म्हणणे आहे.

जर ओएनजीसीला सदर जमिनीची आवश्यकता उरलेली नसेल, तर त्या जागेवर आरोग्य सुविधा, शैक्षणिक संस्था किंवा इतर सार्वजनिक सेवा प्रकल्प उभारण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे. केंद्र सरकारच्या अखत्यारीत असलेल्या ओएनजीसी निवासी संकुलची पुनर्बांधणी करावी अशी मागणी संबंधित प्रशासनाकडे केली असल्याचे माजी नगरसेवक अशोक गुरखे यांनी सांगितले.

# सुधागडात भाजपला संघटनात्मक बळ

## युवा नेते निलेश खोडागळे यांच्यासह कुटुंबीय, समर्थकांच्या हाती ‘कमळ’

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात भाजपला संघटनात्मकदृष्ट्या अधिक बळकटी व उभारी मिळताना दिसत आहे. पाली येथील प्रतिष्ठित खोडागळे कुटुंबीय आणि असंख्य कार्यकर्ते यांनी शुक्रवारी भारतीय जनता पक्षात ज्येष्ठ नेते प्रकाश देसाई, गीता पालरेचा व अन्य प्रमुख पदाधिकारी यांच्या नेतृत्वात व उपस्थितीत जाहीर प्रवेश केला.



या कार्यक्रमास भाजप सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, प्रणाली शेठ, नगराध्यक्ष पराग मेहता, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत वारगुडे, माजी नगराध्यक्ष अरिफ मनियार, नाशिकच्या नगरसेविका अंकिता शिंदे, अ‍ॅड. महेंद्र शिंदे, जिल्हा सरचिटणीस विठ्ठल सिंदकर, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सुजित बारसकर, तालुका सरचिटणीस नरेश खाडे, राजेश कानडे, रवी ठोंबरे, वैभव जोशी आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी युवा नेतृत्व निलेश खोडागळे, आनंद खोडागळे, अक्षय खोडागळे, अनिल खोडागळे, सुजल क्षीरसागर, माधुरी खोडागळे, सुनीता खोडागळे, सोनल क्षीरसागर, मधुकर खोडागळे, सुधाकर खोडागळे, स्वप्नील खोडागळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

यावेळी प्रकाश देसाई यांनी प्रवेशकर्त्यांचे भाजपमध्ये स्वागत करून पक्षात सर्वांना योग्य तो मानसन्मान व न्याय दिला जाईल, अशी ग्वाही दिली. याबरोबरच येत्या काही दिवसात पालीत मोठा राजकीय भूकंप होणार असून शेकडो कार्यकर्ते भाजपत सहभागी होणार असल्याचे सांगितले.

भाजप नेत्या गीता पालरेचा म्हणाल्या की, प्रकाश देसाई यांच्या प्रयत्नाने आज एक सुसंस्कृत असे खोडागळे कुटुंब भाजप परिवारात दाखल झाले याचा मनस्वी आनंद झाला. निलेश खोडागळे व या कुटुंबाच्या पाठीशी आम्ही कायम खंबीरपणे उभे राहू.

प्रवेशकर्ते निलेश खोडागळे यांनी आपण देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्व व कुशल कार्यप्रणालीवर प्रभावित होऊन भाजप परिवारात दाखल होत असून वरिष्ठ नेते, पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाला संघटनात्मक ताकत देण्यासाठी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही दिली.

# आमदार रविशेठ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रोह्यात विविध उपक्रम



**धाटाव : प्रतिनिधी**

माजी कॅबिनेट मंत्री तथा विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुक्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. रोठ खुर्द येथील राजिप शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले, तर धाटाव परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

रोहा भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या नेतृत्वाखाली तसेच धाटाव विभागाध्यक्ष सचिन मोरे यांच्या पुढाकाराने हे उपक्रम राबविण्यात आले.

यावेळी बोलताना भाजपा तालुकाध्यक्ष अमित घाग म्हणाले, आमदार रविशेठ पाटील यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक कार्यातून सर्वसामान्य जनतेच्या विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवून त्यांच्या कार्याला अनोख्या पद्धतीने शुभेच्छा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. विष्यातही त्यांच्या प्रेरणेने रोहा तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जातील.

या कार्यक्रमास भाजप महिला जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, भाजप उपाध्यक्ष सागर जोगडे, रायगड जिल्हा सोशल मीडिया संयोजक सुनील इंगावले, निलिमा मोरे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते, शाळेच्या मुख्याध्यापिका सानप मॅडम, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लव्हेज ग्रामस्थांतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीजवळील लव्हेज गावातील दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा ग्रामस्थांतर्फे सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला हेल्प फाउंडेशनच्या कार्यकर्त्या भक्ती साठीलकर, कुमारी शिंदे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना साठीलकर यांनी गावात ग्रामस्थांनी आयोजित केलेल्या चांगल्या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करताना, प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपला अभ्यास मन लावून चांगल्या मार्कांने उत्तीर्ण होऊन यशस्वी भरारी घ्यावी, असे आवाहन केले. शिंदे यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांना



शुभेच्छा दिल्या

प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. शिक्षक समीर शिंदे यांनी या कार्यक्रमाची पार्श्वभूमी सांगताना गावातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे हा यामागचा हेतू असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन प्रशांत ठरकुडे यांनी केले. यावेळी राम पाटील, पांडुरंग चितळकर, यशवंत ठरकुडे, किशोर पाटील, सुदेश थरकुडे यांच्यासह गावातील अनेक ग्रामस्थ व महिलावर्ग उपस्थित होता.

# ‘आरसीएफ’तर्फे अंगणवाड्यांना साहित्य वाटप

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल अ‍ॅण्ड फर्टिलायझर आणि क्षितीज मल्टीपर्पज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शहापूर ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील पाच अंगणवाड्यांना साहित्य वाटप करण्यात आले तसेच महिलांसाठी आरोग्यविषयक जनजागृती शिबिर घेण्यात आले.



शहापूर ग्रामपंचायत कार्यालय सभागृहात आयोजित कार्यक्रमात अलिबाग पंचायत समितीच्या सभापती भाग्यता पाटील यांच्या हस्ते अंगणवाड्यांना साहित्य वाटप करण्यात आले. क्षितीज मल्टीपर्पज असोसिएशनच्या संस्थापिका शीतल माळी यांनी महिलांना पोषण आहार आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास ग्रामपंचायत प्रशासक त्रिशाली सोनवडेकर, माजी सदस्य स्वप्नील पाटील यांच्यासह अंगणवाडी सेविका, आशा सेविका, बचत गटातील महिला, ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामपंचायत अधिकारी गणेश म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी सुधीर म्हात्रे, महेश पाटील, सुविधा मोकल, ममता मोकल यांनी परिश्रम घेतले.

# आदर्श शाळा मजगाव येथे संगणक कक्षाचे उद्घाटन

## विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी मिळणार आधुनिक तंत्रज्ञानाची जोड

**मुरूड : प्रतिनिधी**

आदर्श शाळा मजगाव येथे विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेतील अध्ययनाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी उभारण्यात आलेल्या संगणक कक्षाचे उद्घाटन पंचायत समितीचे सभापती निलेश घाटवळ यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी सुनिल गवळी, केंद्रप्रमुख दिनेश म्हात्रे, शाळेच्या मुख्याध्यापिका रेश्मा धुमाळ, बाळासाहेब फुंदे, चेतन चव्हान, स्वप्नाली बाजी, हर्षा नांदगावकर, संतोष दहातोंडे, ओंकार भोई, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मिथून भोईर, योगेंद्र गोयजी, शुभ्रा शिरधनकर, साधन व्यक्ती चेतन पाटील आदी उपस्थित होते.



यावेळी घाटवळ यांनी, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवावे व यश संपादन करावे, असे आवाहन केले.

# विक्रम मिनिडोअर चालक मालक संस्थेची नूतन कार्यकारिणी जाहीर

**अलिबाग** : अलिबाग विक्रम मिनिडोअर चालक मालक कल्याणकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा झिराड येथे झाली. या सभेत नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली.

यावेळी पुढील तीन वर्षांसाठी अध्यक्ष म्हणून दिलीप भोईर यांची फेरनिवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी विलेश पाटील, उपाध्यक्षपदी विजय थळे, सचिवपदी शिवाजी जांभळे, सहसचिव कवेश म्हात्रे, खजिनदार संतोष म्हात्रे, सहखजिनदार भरत म्हात्रे, सल्लागार म्हणून अ‍ॅड. प्रवीण ठाकूर, तर कार्यकारिणी सदस्य म्हणून आशिष पाटील, गजानन भगत, अंकुश म्हात्रे, गणेश लोहार, अनिल वाकडे, सचिन राणे, विलास थळे, मंदार कवजी, जितू वाघे, मदन कोळी, मयुरेश पाटील, नरेश कोळी, संतोष म्हात्रे, प्रशांत घरत यांची निवड झाली.

# मार्केवाडीमध्ये संत्संग मुक्तीपर्व सोहळा

**कर्जत : प्रतिनिधी**

संत निरंकारी सत्संगाच्या वतीने मार्केवाडी येथे आयोजित सत्संग सोहळ्यातील मुक्तीपर्वला असंख्य सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमात येथे सत्संग भवन उभारण्यासाठी जमीन देण्याचे जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे यांनी जाहीर केले.

संत निरंकारी परिवाराच्या माध्यमातून सद्गुरू माता सुदिक्षा महाराज यांच्या कृपाशिर्वादाने संपूर्ण निरंकारी जगतात मुक्ती पर्व दिवस साजरा केला जातो. मार्केवाडी येथील मयुरेश सभागृहात सुमारे ६०० सत्संग सदस्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. यावेळी निरंकारी परिवाराचे अलिबाग येथील शिवराम गायकर महाराज यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जि.प. सदस्य बाबू घारे, आगरी समाज संघटनेचे कर्जत तालुकाध्यक्ष संतोष पेरणे तसेच सेवादलचे सदस्य उपस्थित होते.



# आज-उद्या कुडपण पर्यटन महोत्सव रंगणार

## पर्यटकांना भोजनासह निवासव्यवस्था मोफत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील कुडपण या ऐतिहासिक व पुरातन अविकसित पर्यटनस्थळी २२ आणि २३ ऑगस्ट रोजी पर्यटन महोत्सवाची हाक स्थानिक व मुंबईस्थित ग्रामस्थांनी दिली आहे. यानिमित्ताने पर्यटकांना भोजनासह निवासव्यवस्था मोफत देण्याचा इरादाही पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी आयोजकांनी जाहीर केला आहे.

कुडपणचा इतिहास कोणालाही सांगता येण्यासारखा प्रचलित नाही. महाराष्ट्रगौरव पुरस्कार मिळालेले महावीरचक्रप्राप्त नाईक कृष्णा सोनावणे यांच्या जन्मगावाचा उल्लेख या गावाच्या अनुषंगाने कायम केला जाऊ शकेल. ब्रिटीशकालीन नकाशामध्ये हिलस्टेशन अशी या कुडपणबाबत नोंद असल्याची माहिती गेल्या २५ वर्षांपासून मिळाल्यानंतर याठिकाणी पर्यटकांची रेलचेल वाढू लागली आहे, मात्र प्रत्यक्षात याठिकाणी अनेक गैरसुविधा असल्याने या कुडपणच्या पर्यटन विकासाच्या मानसिकतेचा आलेख मांडण्याची गरज निर्माण झाली आहे.

आध्यात्मिकदृष्ट्या श्रीगणेशनाथ महाराज संस्थानाशी नाळ जोडल्यानंतर कुडपणकरांनी मांसाहार वर्ज्य करून हरीनाम जपण्यास सुरुवात केली. कुडपण येथील भराडा, भुतरान आणि आवेरी या तीन नद्यांच्या उगमस्थानाजवळच जगबुडी नदीमध्ये संगम झाला आहे. याठिकाणी असलेल्या



स्वयंभू भराडीदेवीच्या मंदिरामध्ये काळकाईदेवीदेखील आहे. अतिशय प्राचीन असे हे देवस्थान असून आजही त्याच स्थितीत आहे. या मंदिरात एक विशाल पुरातन सांबरशिंग मंदिरात प्रवेश केल्यानंतर दिसून येते. अलिकडेच या कुडपण गावात वातारकांब नावाची एक गुहा आढळून आली आहे.

कुडपण येथे प्रस्तरारोहण करण्यासाठी येथील भिमाची काठी या दूर्गम सुळक्यावर चढाईसाठी काही गिर्यारोहकही तीन-तीन दिवसांचे कॅम्प करतात. यापूर्वी याठिकाणी गिर्यारोहकांनी बर्मा ब्रिज हा तात्पुरता दोरखंडाच्या साह्याने पुल बांधून भिमाच्या काठीपर्यंत जाण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता. शेलारांच्या कुडपणकडे प्राथमिक व शाळा, माध्यमिक शाळा आहे. सद्गुरू अरविंदनाथ महाराजांच्या आध्यात्मिक मार्गदर्शनामुळे उत्तम गांवगाडा चालतोय, मात्र रस्ता नसल्याने अनारोग्य व अपघातप्रसंगी



आजही अडचण निर्माण होत आहे.

पोलादपूर तालुक्यातील कुडपण हे गाव इंग्रजांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार हिलस्टेशन असल्याचे नमुद करण्यात आले. या गावाचे सुपुत्र नायक कृष्णा सोनावणे यांनी ब्रिटीशांच्या बॉईज कंपनीतून सैन्यात प्रवेश घेतल्यानंतर स्वतंत्र भारतातील सेनादलामधून पाकिस्तानी सैन्याची आणि कबाली घुसखोरांची दाणादाण उडविल्याबद्दल त्यांचा महावीरचक्र देऊन सन्मान करण्यात आला. त्याकाळी जन्मगावी कुडपण येथे सेवानिवृत्तीनंतर राहून उर्वरित आयुष्य कंठणे, तेथील अविकसित आणि भौगोलिक परिस्थितीमुळे केवळ अशक्य असल्याने त्यांनी येथे राहणे टाळले.

काही वर्षांपूर्वी कुडपण येथे पर्यटन विकासासाठी प्रयत्नशील राजेंद्र शेलार या तरुणाने केलेला वर्षा सहलीचा प्रयत्न केला, मात्र त्यालाच पुलाखालील पाण्याचा अंदाज न आल्यामुळे त्याचा दुर्दैवी मृत्यू होऊन पर्यटन विकासासाठीचे प्रयत्न खुंटले होते.

आज कुडपण येथील पर्यटन महोत्सवानिमित्त रायगड जिल्हा, कोकण, तसेच राज्यासह देश-विदेशातील पर्यटक कुडपण परिसरातील निसर्गरम्य दृश्ये, धबधबे, नद्या, ट्रेकिंग व निसर्ग भ्रमण, संध्याकाळी धुकं व गारवा यांचा अनुभव घेणार आहेत. या काळात सोशल मीडियावरून रिल्स, फोटोग्राफी व व्हिलॉग्स तसेच वृत्तपत्रांतून निसर्ग पर्यटन वर्णनात्मक लेखनाद्वारे प्रोत्साहन देण्यासाठी या कुडपण पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सरपंच सचिन चिकणे आणि मुंबईस्थित अशोक चिकणे यांनी दिली.



**रेवदंडा : रायगड जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री भरत गोगावले यांनी गुरुवारी ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची सदिच्छा भेट घेत आशीर्वाद घेतले. आमदार महेंद्र दळवी, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, रायगड भूषण सचिन धर्माधिकारी, राहुल धर्माधिकारी यांच्यासह शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी धर्माधिकारी कुटुंबीयांच्या वतीने ना. गोगावले यांचा सत्कार करण्यात आला.** (छाया : महेंद्र खैरे)

# जिंदल विद्यामंदिरच्या विद्यार्थिनींचे राष्ट्रीय कथ्थक स्पर्धेत सुयश

**मुरूड : प्रतिनिधी**

जिंदल विद्यामंदिर, साळावच्या दोन विद्यार्थिनींनी राष्ट्रीय स्तरावरील कथक नृत्य स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. मीरारोड, मुंबई येथील लता मंगेशकर सभागृहात आयोजित कलांजली उत्सव राष्ट्रीय कथक नृत्य स्पर्धेत या विद्यार्थिनींनी ३०० स्पर्धकांमधून प्रथम क्रमांकाचा मान पटकावला.



या स्पर्धेत इयत्ता सातवी ब मधील अनुश्री अरविंद द्विवेदी आणि इयत्ता सहावी ब मधील शरण्या संतोष वाघमोडे यांनी आपल्या उत्कृष्ट कथक नृत्याविष्काराने परीक्षकांची मने जिंकली. त्यांच्या उल्लेखनीय सादरीकरणाला प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले.

या उल्लेखनीय यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक, प्राचार्य मुकेश ठाकूर, उपप्राचार्य मंगेश बमनोटे यांनी अनुश्री द्विवेदी आणि शरण्या वाघमोडे यांचे अभिनंदन केले तसेच भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# दुसऱ्या कसोटीसाठी श्रीलंकेचा संघ जाहीर

## तीन खेळाडूंना डच्चू



**कोलंबो : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्यात सुरू असलेल्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा आणि निर्णायक सामना २३ ऑगस्टपासून कोलंबो येथे खेळवला जाणार आहे. या महत्त्वाच्या लढतीसाठी भारतीय संघ आधीच मैदानावर दाखल झाला असून यजमान श्रीलंका क्रिकेट मंडळानेही आपला सुधारित संघ जाहीर केला आहे.

खेळाडूंच्या दुखापतींच्या समस्येशी झगडणाऱ्या श्रीलंकन संघात दुसऱ्या कसोटीपूर्वी मोठे फेरबदल पाहायला मिळत आहेत. पहिल्या कसोटी सामन्यादरम्यान दुखापतग्रस्त (कनकशन) झालेला अनुभवी फलंदाज दिनेश चंडीमल अजूनही तंदुरूस्त न झाल्याने त्याला दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडावे लागले आहे. त्याच्या अनुपस्थितीत निवड समितीने कामिल मिशारा आणि सहान अराचिगे या दोन अनकॅप्ड खेळाडूंना संघात संधी दिली आहे. या दोघांपैकी ज्याला अंतिम अकरामध्ये स्थान मिळेल, त्याचा हा पदार्पणाचा कसोटी सामना ठरेल. याशिवाय खराब कामगिरी आणि संघ संयोजनामुळे निशान मदुश्का, रमेश मेंडिस आणि दिलशान मदुशंका यांना संघातून वगळण्यात आले आहे.

दुसऱ्या कसोटीसाठी घोषित करण्यात आलेल्या श्रीलंकन संघात धनंजय डी सिल्वा (कर्णधार), कामिंडु मेंडिस (उपकर्णधार), लाहिरू उदारा, कामिल मिशारा, पसिंदू सूर्याबंदारा, सहान अराचिगे, सोनल दिनुशा, निरोशन डिकवेला, केशरा नुवंता, प्रभात जयसूर्या, मिलन रत्नायके, लाहिरू कुमारा, असिता फर्नांडो आणि विश्वा फर्नांडो यांचा समावेश आहे.

दुसरीकडे, भारताचा कसोटी संघ शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली मैदानात उतरणार असून केएल राहुल उपकर्णधाराची धुरा सांभाळत आहे. या संघात यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत, सरफराज खान, ध्रुव जुरेल, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, मानव सुथार, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, गुरनूर ब्रार, देवदत्त पडिक्कल, सारांश जैन आणि औकिब नबी यांचा समावेश आहे.

**'डब्ल्यूटीसी'साठी प्रतिष्ठेची लढत**

आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेच्या दृष्टीने ही मालिका दोन्ही देशांसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. पहिल्या सामन्यातील पराभवामुळे श्रीलंकेचा संघ सध्या दबावाखाली असून मालिका वाचवण्यासाठी त्यांना कोलंबो कसोटीत सर्वस्व पणाला लावावे लागणार आहे. सध्या जागतिक कसोटी अजिंक्यपद क्रमवारीच्या गुणतालिकेत भारतीय संघ पाचव्या, तर श्रीलंकेचा संघ सहाव्या स्थानावर विराजमान आहे.

# हॉकी वर्ल्डकपमध्ये भारत पुढील फेरीत

## इंग्लंडला गोलशून्य बरोबरीत रोखले

**ॲम्स्टेलवीन : वृत्तसंस्था**

हॉकी वर्ल्डकपमध्ये गुरुवारी भारत आणि इंग्लंड महिला संघांमध्ये डी गटातील अखेरचा साखळी सामना रंगला. अत्यंत रोमांचक झालेल्या या सामन्यात भारताने इंग्लंडला ०-० असे गोलशून्य बरोबरीत रोखत पुढील फेरीत प्रवेश केला. भारतासाठी बरोबरी किंवा विजय पुरेसा होता, तर इंग्लंडला पुढे जाण्यासाठी विजय आवश्यक होता. या बरोबरीमुळे इंग्लंडचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.

पहिल्या क्वार्टरमध्ये सामना चुरशीचा असल्याने दोन्ही संघांनी आक्रमक सुरुवात केली. चौथ्या मिनिटाला नवनीत कौरच्या पासवर इशिकाने गोलचा प्रयत्न केला, मात्र इंग्लंडची गोलकिपर प्रिचर्डने तो रोखला. भारताला सातव्या आणि इंग्लंडला दहाव्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळाला, पण दोन्ही संघांना गोल करण्यात यश आले नाही. पहिला क्वार्टर ०-० असा संपला.

दुसऱ्या क्वार्टरमध्ये इंग्लंडने चेंडूवर अधिक ताबा ठेवला. २२व्या मिनिटाला सलिमाचा प्रयत्न प्रिचर्डने रोखला. भारताला २६व्या मिनिटाला पेनल्टी



कॉर्नर मिळाला, मात्र त्याचाही फायदा झाला नाही. इंग्लंडच्या पेनल्टी कॉर्नरवरही भारताने प्रभावी बचाव केला. होवार्डला यलो कार्ड मिळाल्याने तिला पाच मिनिटे मैदानाबाहेर राहावे लागले. दुसरा क्वार्टरही गोलशून्य राहिला.

तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारताने आक्रमक सुरुवात करत ३१व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळवला. प्रिचर्डने शानदार बचाव केला. सलीमाच्या रिबाऊंडवरील प्रयत्नानंतर भारताला पुन्हा पेनल्टी कॉर्नर मिळाला, मात्र गोल झाला नाही. त्यानंतर इंग्लंडने सलग पेनल्टी कॉर्नर मिळवत दबाव वाढवला, पण भारतीय बचाव भेदण्यात त्यांना अपयश आले.



**मुंबई : महाराष्ट्राच्या संजय सरदेसाई यांची दक्षिण आफ्रिकेतील सनसेट सिटी येथे होणाऱ्या जागतिक ज्युनिअर व सब ज्युनिअर पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी भारतीय संघाचे प्रशिक्षक व पंच म्हणून निवड झाली आहे. भारताकडून पुरुष गटात भाग्य धवन (महाराष्ट्र), तर महिला गटात किया कुनाल (हरियाणा) व अस्मा झबुवावाला (गुजरात) यांचा समावेश आहे. संघ शुक्रवारी द. आफ्रिकेला रवाना झाला.**

# जो रूटची सचिन तेंडुलकरच्या खास विक्रमाशी बरोबरी

**हेडिंग्ले : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा फलंदाज जो रूटने लीड्समध्ये पाकिस्तानविरुद्ध सुरू असलेल्या पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी अर्धशतक झळकावत टीम इंडियाचा माजी दिग्गज फलंदाज सचिन तेंडुलकरच्या एका मोठ्या विक्रमाची बरोबरी केली. रूटने इंग्लंडच्या पहिल्या डावात १० चौकारांच्या मदतीने ६६ धावांची खेळी केली. यासह तो कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक अर्धशतके झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत सचिनसोबत संयुक्तपणे अव्वल स्थानी पोहचला आहे.

पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात जो रूटने कसोटी कारकिर्दीतील ६८वे अर्धशतक झळकावले. सचिन तेंडुलकरने आपल्या कसोटी कारकिर्दीत ६८

## कमी डावांत ६८ अर्धशतके



अर्धशतके झळकावली होती, मात्र, रूटने सचिनपेक्षा कमी सामन्यांमध्ये हा विक्रम गाठला आहे. सचिनने २०० कसोटी सामन्यांमध्ये ६८ अर्धशतके केली होती, तर रूटने अवघ्या १६७ व्या कसोटी सामन्यात हा पराक्रम केला. त्यामुळे याच सामन्यात रूटला सचिनला मागे टाकण्याची संधी आहे. दुसऱ्या डावातही अर्धशतक झळकावल्यास रूट कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक अर्धशतके करणारा फलंदाज ठरेल.

## कसोटी शतकांच्या विक्रमावरही नजर


सचिन तेंडुलकर कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकवणाऱ्या फलंदाजांच्या यादीत अव्वलस्थानी आहे. त्याने आपल्या कारकिर्दीत ५१ कसोटी शतके झळकावली आहेत. रूटने आतापर्यंत ४१ कसोटी शतके केली असून सर्वाधिक कसोटी शतकांच्या यादीत तो संयुक्तपणे तिसऱ्या स्थानावर आहे. त्याच्या पुढे दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज जॅक कॅलिस आहे, ज्याच्या नावावर ४५ कसोटी शतके आहेत. सचिन आणि कॅलिस दोघेही निवृत्त झाले असून रूटला या दोघांना मागे टाकत अव्वलस्थानी पोहचण्याची संधी आहे. तो हा डाव साधणार का? ते पाहण्याजोगे असेल.

# दुलीप ट्रॉफीचा अंतिम सामना चेपॉक स्टेडियमवर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दुलीप ट्रॉफी २०२६-२७चा अंतिम सामना आता बंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई)ऐवजी चेन्नई येथील एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर खेळवला जाईल. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अंतिम सामन्याचे ठिकाण बदलण्याचा निर्णय घेतला. या स्पर्धेतील विजेतेपदाचा सामना ६ ते १० सप्टेंबर दरम्यान खेळला जाईल.

बीसीसीआयने सांगितले की, अंतिम सामना चेन्नईला हलवण्यामागील मुख्य कारण म्हणजे स्टेडियमवर जास्तीत जास्त प्रेक्षकांना सामना पाहता यावा. सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये प्रेक्षकांच्या संख्येवर काही निर्बंध आहेत, त्यामुळे मंडळाने अंतिम सामन्यासाठी एक मोठे आणि



प्रेक्षकांसाठी सोयीस्कर ठिकाण निवडले आहे.

दुलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्याव्यतिरिक्त इतर सर्व सामने सेंटर ऑफ एक्सलन्समध्येच खेळवले जातील. स्पर्धेची सुरुवात २३ ऑगस्ट रोजी पूर्व विभाग-ईशान्य विभाग आणि उत्तर विभाग-पश्चिम विभाग सामन्यांनी होईल. सर्व सामने थेट प्रक्षेपित केले जातील. एक उपांत्यपूर्व फेरीचा, एक उपांत्य फेरीचा आणि अंतिम सामना टीव्हीवरही उपलब्ध असेल.

# रायगड जिल्हास्तरीय सब-ज्युनिअर, ज्युनिअर व सीनियर वुशू अजिंक्यपद स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वुशू असोसिएशन पनवेल-रायगडच्या वतीने पहिली रायगड जिल्हास्तरीय सब-ज्युनिअर, ज्युनिअर व सीनियर वुशू अजिंक्यपद स्पर्धा २३ ऑगस्ट रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय, नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील विविध वयोगटांमधील वुशू खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. खेळाडूंना जिल्हास्तरावर दर्जेदार स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या क्रीडा कौशल्याला चालना देणे तसेच वुशू या क्रीडा प्रकाराचा जिल्ह्यात प्रचार व प्रसार करणे, हा स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे.

वुशू हा शिस्त, आत्मविश्वास, शारीरिक तंदुरूस्ती आणि स्वसंरक्षणाची



भावना विकसित करणारा क्रीडा प्रकार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून जिल्ह्यातील युवा खेळाडूंना आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची तसेच भविष्यातील उच्चस्तरीय स्पर्धांसाठी आवश्यक अनुभव मिळवण्याची संधी मिळणार आहे.

स्पर्धेच्या उद्‌घाटन समारंभास विविध मान्यवर, क्रीडा क्षेत्रातील पदाधिकारी, प्रशिक्षक, पालक व क्रीडाप्रेमी उपस्थित राहणार आहेत. सहभागी खेळाडूंना प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळावे तसेच स्पर्धा शिस्तबद्ध वातावरणात पार पडावी, यासाठी आयोजकांकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेस ऑल महाराष्ट्र वुशू असोसिएशनचे आधारस्तंभ एस.एस. कटके, अध्यक्ष ए.व्ही. खर्डेकर व महासचिव एल.एस. कटके यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे.

वुशू असोसिएशन पनवेल रायगडचे अध्यक्ष जयकुमार यादव, सचिव स्वप्नील वारंगे व स्पर्धा आयोजक स्मितील पाटील व प्रतिक्षा शेरकर यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व खेळाडू, पालक, प्रशिक्षक, क्रीडा संघटना व क्रीडाप्रेमींनी या स्पर्धेला सहकार्य करून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# कॅनडाच्या मुख्य प्रशिक्षकाचा राजीनामा

**ओटावा :** कॅनडाच्या पुरुष क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक मॉन्टी देसाई यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. १ मे २०२६ रोजी त्यांची दुसऱ्यांदा मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती, पण त्यांचा दुसरा कार्यकाळ फार काळ टिकला नाही आणि त्यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे आपल्या पदाचा राजीनामा जाहीर केला.



कॅनडाच्या क्रिकेटमध्ये मॅच-फिक्सिंगचे गंभीर आरोप समोर आले आहेत. जेव्हा सीबीसीच्या एका माहितीपटात कॅनेडियन क्रिकेटमध्ये संघटित गुन्हेगारीचा हस्तक्षेप आणि सामन्यांवर व संघ निवडीवर प्रभाव असल्याचा आरोप करण्यात आला, तेव्हा हे प्रकरण उघडकीस आले. या प्रकरणात लॉरेन्स बिश्नोई टोळीचाही सहभाग असल्याचे म्हटले जात आहे. क्रिकेटपटू आणि संघाच्या सदस्यांवर धमक्या देऊन दबाव आणल्याचा आरोप आहे.

# बॅडमिंटन विश्व चॅम्पियनशिपमध्ये सिंधू, आयुष शेट्टीला पराभवाचा धक्का

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बॅडमिंटन विश्व चॅम्पियनशिपमध्ये महिला एकेरी, पुरुष एकेरी आणि मिश्र दुहेरीमधील भारताचे आव्हान संपुष्टात आले. महिला एकेरीमध्ये पीव्ही सिंधूला चीनच्या वांग झी यीकडून पराभव पत्करावा लागला, तर पुरुष एकेरीमध्ये आयुष शेट्टी इंडोनेशियाच्या अल्वी फरहानकडून पराभूत झाला.

आयुष शेट्टीने पहिल्या फेरीत जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या शी यू चीला पराभूत करून खळबळ उडवून दिली होती, पण उपांत्यपूर्व फेरीत १२व्या क्रमांकाच्या खेळाडूकडून तो १९-२१, ११-२१ ने पराभूत झाला. फरहानसोबतची आयुषची ही आठवी लढत होती आणि त्यात त्याचा पाचवा पराभव झाला. या पराभवामुळे पुरुष एकेरीतील भारताचे आव्हान संपुष्टात आले. लक्ष्य सेन एक दिवसापूर्वी ९२ व्या क्रमांकाच्या अमेरिकन खेळाडू गॅरेथ टेनकडून पराभूत झाला होता.

तिसऱ्या मानांकित वांगने पाच वेळच्या पदक विजेत्या सिंधूला २१-११, १५-२१, २१-



१७ असे हरवले. आठ सामन्यांनंतर, जागतिक चॅम्पियनशिपमध्ये चिनी खेळाडूकडून झालेला भारतीय स्टारचा हा पहिलाच पराभव होता. गेल्या वर्षी याच स्पर्धेत सिंधूने वांगला हरवले होते, पण यावेळी ती अपयशी ठरली.

**गायत्री-त्रिशा उपांत्यपूर्व फेरीत**

गायत्री गोपीचंद आणि त्रिशा जॉली यांनी बॅडमिंटन जागतिक चॅम्पियनशिपमध्ये उपांत्यपूर्व फेरी गाठून एक मोठा उलटफेर घडवला आहे. आता त्या पदकापासून केवळ एक विजय दूर आहेत. या भारतीय जोडीने जपानच्या सातव्या मानांकित रिन इवानागा आणि केई नाकानिशी यांना हरवून स्पर्धेत एक मोठा उलटफेर घडवला.

# ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकर महाकालच्या चरणी



**उज्जैन : वृत्तसंस्था**

ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनू भाकरने मध्य प्रदेशातील उज्जैन येथील जगप्रसिद्ध ज्योतिर्लिंग भगवान महाकालेश्वर मंदिराला बाबा महाकालच्या दर्शनासाठी भेट दिली. तिने प्रसिद्ध भस्म आरतीतही सहभाग घेतला, विधीवत पूजा केली आणि आशीर्वाद घेतले. यावेळी, ती नंदी हॉलमध्ये बसली आणि नंदी महाराजांच्या कानात आपल्या इच्छा सांगितल्या.

भारताची स्टार नेमबाज आणि ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकरने पहाटे उज्जैन येथील ज्योतिर्लिंग भगवान महाकालेश्वर मंदिराला भेट दिली. तिने सकाळच्या भस्म आरतीत सहभाग घेतला आणि पूर्ण धार्मिक श्रद्धेने बाबा महाकालची पूजा केली. भस्म आरतीनंतर मनू भाकर नंदी हॉलमध्ये बसली आणि तिने भगवान शिवाचे वाहन असलेल्या नंदी महाराजांच्या कानात आपल्या इच्छा कुजबुजल्या. धार्मिक मान्यतेनुसार नंदीच्या कानात कुजबुजलेले शब्द थेट बाबा महाकाल यांच्यापर्यंत पोहचतात.

दर्शनानंतर माध्यमांशी बोलताना, मनू भाकरने मंदिरातील व्यवस्था आणि भक्तिपूर्ण वातावरणाची प्रशंसा केली. तिने सांगितले की, महाकाल दरबारला भेट देण्याची त्यांची खूप दिवसांपासून इच्छा होती. जरी त्यांना तिथे जास्त वेळ घालवण्याची संधी मिळाली नसली, तरी तेथील भक्ती आणि सुव्यवस्थित व्यवस्थेने त्यांचे मन आनंदाने भरून गेले. तिने महाकाल मंदिराचे व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांच्या कठोर परिश्रमाचे कौतुक केले आणि भगवान महाकालाचा आशीर्वाद सर्वांवर राहो व देशवासियांनी असेच कठोर परिश्रम करत राहावे अशी प्रार्थना केली.

# बीपीएल यंदा स्पर्धा रद्द होण्याची शक्यता

**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेश क्रिकेट जगतातून एक मोठी बातमी समोर येत आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे (बीसीबी) अध्यक्ष तमीम इक्बाल यांनी दिलेल्या माहितीनुसार गेल्या दोन हंगामांत झालेल्या तब्बल ३१ कोटी रुपयांच्या (४० कोटी बांगलादेशी टाका) प्रचंड आर्थिक नुकसानीमुळे यावर्षी बांगलादेश प्रीमियर लीग (बीपीएल) ही प्रतिष्ठित टी-२० स्पर्धा रद्द होण्याची दाट शक्यता आहे.

तमीम इक्बाल यांनी एका मुलाखतीत स्पष्ट केले की, जोपर्यंत मंडळाची ढासळलेली आर्थिक स्थिती आणि फ्रँचायझींशी संबंधित वाद पूर्णपणे सुटत नाहीत, तोपर्यंत दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन करणे योग्य नाही. ही व्यवस्था सुरळीत करण्यासाठी सहा, १२ किंवा २४ महिने लागले तरी मंडळाला ते मान्य आहे, असेही त्यांनी नमूद केले. बीसीबी सध्या देशांतर्गत क्रिकेटच्या वेळापत्रकावर काम करत असून लवकरच याबाबत अधिकृत घोषणा केली जाण्याची शक्यता आहे.

या नाट्यमय घडामोडींमुळे भारत आणि बांगलादेश यांच्यातील बहुप्रतिक्षित क्रिकेट मालिकेच्या वेळापत्रकातही मोठा फेरबदल होण्याची चिन्हे आहेत.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com